
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष बाविसावे/अंक ३/मार्च २०२१

## प्राचार्य डॉ. मधुसुदन दत्तात्रय नाडकर्णी
## जन्मशताब्दी वर्ष विशेषांक



**प्रा. डॉ. मधुसुदन दत्तात्रय नाडकर्णी**

(जन्म : १९२१ – मृत्यू : १९९०)

माजी प्राचार्य– जोशी बेडेकर आणि बांदोडकर महाविद्यालय, ठाणे (१९७१–१९७६)

माजी प्राचार्य– बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे (१९७६–१९८०)

## संपादकीय

## प्राचार्य डॉ. मधुसुदन दत्तात्रय नाडकर्णी

भारतीय संस्कृतीने गुरूला फार महत्त्वाचे स्थान दिले आहे. मातृ देवो भव्। पितृ देवो भव्। आचार्य देवो भव्। असा विचार आपली संस्कृती देते. आई-वडिलांइतके किंबहुना काकणभर अधिक महत्त्व गुरूला दिले गेले आहे. गुरू आणि शिक्षक या दोन भिन्न संज्ञा आहेत. चार भिंतींच्या आत विद्यार्थ्यांना ठरावीक अभ्यासक्रम शिकवतो तो शिक्षक. 'शिक्षकी' हा पेशा आहे; मात्र गुरू या शब्दाला एक विशिष्ट उंची व खोली आहे. आपल्या आचरणातून जो विद्यार्थ्यांना शिकवतो; आयुष्यातील कठीण प्रसंगांमध्ये योग्य निर्णय कसे घेतले पाहिजेत हे शिकवतो तो गुरू. गुरूचे गुण शिक्षकात आले तर तो दुग्धशर्करा योगच म्हणायला हवा. असे गुरू कमी असतात. डॉ. नाडकर्णी अशा गुरूंपैकी एक होते असे मला वाटते.

मुलांच्या संस्कारक्षम वयात योग्य संस्कार होणे आणि चार भिंतींच्या पलीकडे जाऊन शिक्षणाच्या व्यापक आयामांना समजून घेणे हे खरे शिक्षण. डॉ. नाडकर्णी हे या विचारांच्या अधिन राहून काम करणारे शिक्षक होते. त्यांचं व्यक्तिमत्त्व साने गुरुजी व विनोबा भावे यांच्या विचारांनी भारलेलं होतं. त्यांची राहणी देखील साधी होती. ते खादी घालत. विद्या प्रसारक मंडळाचा शैक्षणिक प्रकल्प सुरू झाला तेव्हा आपल्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून त्यांनी सक्षमपणे काम केलं. त्यावेळी त्यांनी विद्यार्थी व प्राध्यापकांवर घडवलेले संस्कार अजूनही विसरता येत नाहीत.


त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या संस्कारांचे, त्यांच्या विचारांचे स्मरण करून आणि असे गुरू आम्हाला लाभोत ही परमेश्वराजवळ प्रार्थना करतो.

**– डॉ. विजय बेडेकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष बाविसावे/अंक ३/मार्च २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक ९ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | २ |
| २) | गुरुवर्य नाडकर्णी सर | डॉ. सौ. माधुरी पेजावर | ३ |
| ३) | 'दां'ना आठवताना | डॉ. आनंद नाडकर्णी | ७ |
| ४) | ग्रामीण महाविद्यालयांसाठी एक उपक्रम महाविद्यालय शाळा समूह | प्राचार्य म. द. नाडकर्णी | १३ |
| ५) | आठवणीचे चांदणे | प्रा. मंगला नांदुर्डीकर(नाडकर्णी) | १८ |
| ६) | आठवणींचे मोशेळ | श्री. शरद नांदुर्डीकर | २० |
| ७) | शिक्षणमहर्षी प्राचार्य म. द. नाडकर्णी | प्रा. सी. जी. पाटील | २१ |
| ८) | म. द. नाडकर्णी : आठवणीचे सुगंधी थेंब | डॉ. नागेश टेकाळे | २३ |
| ९) | प्राचार्य म. द. नाडकर्णी एक शिक्षणव्रती | श्री. अशोक टिळक | २६ |
| १०) | तेजस्विता आणि व्रतस्थता यांचा एक मूर्तिमंत उद्‌गार! | श्री. प्रवीण दवणे | २८ |
| ११) | माझ्या आठवणीतील आदरणीय प्राचार्य श्री. नाडकर्णी सर | शीला गजानन टेंबे | २९ |
| १२) | आमचे नाडकर्णी सर | डॉ. नंदिनी पाटील | ३० |
| १३) | प्राचार्य म. द. नाडकर्णी सर - एक अनुभव चिंतन | मंजिरी सुभाष धर्माधिकारी | ३१ |
| १४) | पितृतुल्य प्राचार्य म. द. नाडकर्णी ! | सौ. सुनीता शेजवलकर | ३३ |
| १५) | प्राचार्य नाडकर्णी सर | प्रा. उषा बाळ | ३५ |
| १६) | प्राचार्य म. द. नाडकर्णी - एक ऋषितुल्य 'मॅटीनी आयडॉल'! | डॉ. संजय जोशी | ३६ |
| १७) | ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व - आमचे नाडकर्णी सर | श्री. शशांक रसाळ | ३८ |
| १८) | ती. स्व. नाडकर्णी सर यांना | रोहिणी रसाळ | ४० |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# गुरुवर्य नाडकर्णी सर

१०/११ नोव्हेंबर २०२० च्या आसपास डॉ. आनंद नाडकर्णी यांचा फोन आला की, मॅडम 'दां' चे हे जन्मशताब्दी वर्ष ! लॉकडाउनमुळे मोठा कार्यक्रम नाही करता येणार, पण १०/१५ जण एकत्र येऊन त्यांच्या आठवणींना उजाळा देऊ या. सप्तसोपानच्या प्रांगणात एक मोठं पिंपळाचं झाड आहे. त्याला छान पार आहे. तिथं मोठ्ठा गोल करून बसू व दांच्या आठवणीत रंगून जाऊ. दिनांक २० नोव्हेंबर. मी ताबडतोब हो म्हटले. नाडकर्णीसरांच्या आठवणी, अरे वा ! नेकी और पूछ पूछ असं झालं.

डॉक्टरांचा फोन ठेवला आणि डोळ्यांसमोर एक सुंदर चित्रपटच साकार झाला. मन पार १९७६ सालात पोचलं ४४ वर्षे मागे! पण सर्वच प्रसंग काल परवा घडल्याप्रमाणे होते.

१०/१२ जून १९७६. एमएस्सची परीक्षा नुकतीच झाली होती व शिक्षकी पेशात शिरायचं असं ठरवलंही होतं. सर्व वर्षांमध्ये मार्कस् चांगले असल्याने संशोधन हाही एक मार्ग होता. पण मनाचा कल शिक्षक होऊन संशोधन करावं असं सांगत होता. त्यामुळे वडिलांनी सांगितले, 'जा हाताने एक अर्ज लिही. तुझ्या गुणपत्रिकांच्या छायाप्रती घे व ठाणा कॉलेजमध्ये जाऊन देऊन ये.' 'कोणाला देऊ?' विचारल्यावर म्हणाले, 'प्राचार्यांना.'

ठाणा कॉलेज तेव्हा नवीन होतं. प्राचार्य कोण हे माहीत नव्हतं. त्यातून मी रुईया महाविद्यालय व रॉयल इन्स्टिट्यूटची विद्यार्थीनी, पण हे महाविद्यालय आमच्या संस्थेने चालू केलं होतं. त्यामुळे त्याबद्दल जवळीक होतीच. मग आण्णांनी सांगितल्याप्रमाणे तयारी केली आणि गेले चरईमध्ये. नारळीपौर्णिमेत खाडीत नारळ सोडायला जाण्याइतका या भागाचा परिचय. महाविद्यालयाचं प्रांगण मोठ्ठं पण एक छोटासा पूल खाडीवरून त्या प्रांगणात पोहचत होता. त्यावरून गेल्यावर शिपायाकडे चौकशी केली की, मला विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्यांना भेटायचे आहे; कुठे जाऊ? त्याने सांगितल्याप्रमाणे विज्ञान महाविद्यालयाच्या इमारतीकडे जात असताना ती सर्व माडाची झाडं आणि बांबूचे बन मला कोकणातच घेऊन गेलं! आणि सर्वात आधी मी त्या परिसराच्या प्रेमात पडले.

प्राचार्यांच्या केबीनच्या शिपायाने सरांना मी भेटायला आल्याचे सांगितले व मला आत पाठवले. आम्हाला रुईया महाविद्यालयात डॉ. आर. ए. कुलकर्णी सर तेव्हा प्राचार्य होते. करारी व्यक्तिमत्त्व, भेदक डोळे, करारी आवाज असे प्राचार्य असतात असं वाटायचं.

केबीनमध्ये गेले आणि अतिशय सौम्य व्यक्तिमत्त्वाचे, हनुवटी किंचित पुढे आलेली, शुभ्र खादीचा पेहेराव, खूप आश्वासक चेहरा असे सर खुर्चीत बसलेले दिसले. आणि एकदम ही खुर्चीतील व्यक्ती मनात घर करून गेली आणि वाटलं खरंच या महाविद्यालयात नोकरी करायला मिळाली तर या सरांच्या हाताखाली काम करायला मजा येईल. त्याच आश्वासक नजरेने सरांनी मला पाहिले व थोड्याशा किनऱ्या आवाजात विचारले, 'काय नाव तुझं? काय काम आहे?' मी माझ्याबद्दलची माहिती व काम सांगितल्यावर त्यांनी अर्ज हातात घेतला, गुणपत्रिका पाहिल्या. त्यावेळेस एम.एस्सी. च्या दुसऱ्या वर्षाचा निकाल लागायचा होता. पण बाकी आधीच्या परीक्षांमध्ये Rank Holder होते. त्यांनी विचारले की, याही परीक्षेत प्रथम क्रमांक मिळेल का? माझं उत्तर– क्रमांकाचं नाही सांगू शकत, पण Distinction नक्की मिळेल. त्यांनी अर्ज वगैरे ठेवून घेतला, जुजबी चौकशी

केली व जायला सांगितलं. २४/२६ जून रोजी महाविद्यालयात मुलाखतीकरता ये असा निरोप मिळाला आणि मी गेले. तोवर निकाल लागला होता व माझ्या विषयात मी पहिली आले होते. मुलाखत छान झाली आणि घरी आले. 'निरोप पाठवू' म्हणाले.

पुन्हा पुढचा निरोप आला ५ जुलै रोजी महाविद्यालयात ये. हा माझा जन्मदिवस. सरांच्या केबीनमध्ये गेले, पाया पडले. सर म्हणाले, 'आजपासून कामावर रुजू हो' आणि पुन्हा तीच आश्वासक पण यावेळेस थोडी मिश्कील नजर, मिश्कील हास्य ! कानांवर विश्वास नव्हता. पण खरंच मला सरांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली होती आणि आता लक्षात येते की, सरांबरोबर काम करताना कळत-नकळत मी खूप शिकत गेले.

आमची लेक्चर्स सुरू झाली की सर वर्गावरून फेरी मारायला बाहेर पडत. आपल्या विज्ञान महाविद्यालयात वर्गाच्या भितींना जमिनीजवळ चौकोनी भोकं आहेत. आम्ही फळ्याकडे बघून लिहिताना या भोकांतून सरांचे पाय दिसायचे आणि आणखी सावध होऊन शिकवले जायचे. खरंतर सर आमच्यावर देखरेख करायला आलेले नसायचे; तर वर्गांबाहेर कोणी टवाळक्या करतंय का? सर्व वर्गामध्ये शिक्षक आहेत ना? हे बघायला ते रोज फेरी मारत. पण आम्ही वयाने अगदीच लहान असल्याने मनात घाबरून जायचो. संध्याकाळी मात्र ऐकायला मिळायचं,- छान पकड आहे हं वर्गावर माधुरी, आज विषय रंगवून शिकवलास... आणि खूप बरं वाटायचं. नकळत लक्षात येत होतं की, प्राचार्यांनी कौतुक केलं की किती आनंद होतो ते!

१२ वीचं पहिलं वर्ष होतं. जुन्या इंटर सायन्सची मुलं होती. आम्ही दोन्ही वर्गांना शिकवायचो. इंटरची मुलं आमच्यापेक्षा वयाने मोठी होती. अभ्यासाकडे केलेल्या दुर्लक्षामुळे मागे पडलेली मुलं खरंतर खूप चांगली पण थोडी दुर्लक्षित. आम्ही त्यांना घाबरून त्यांच्या सर्व समस्या सोडवायचो. अशी २५/३० मुलं सरांनी आमच्याकडे सोपवली आणि जास्तीचा अभ्यास करून घ्यायला सांगितलं आणि मजा म्हणजे सर्व मुलं पास झाली. आम्ही त्यांचा अभ्यास नीट करून घेऊ हा सरांचा विश्वास व नापास जरी झाली असली तरी योग्य मार्गदर्शन केल्यावर ती पास होतील ही आम्हाला दिलेली शिकवण पुढे आयुष्यभर उपयोगी पडली.

महाविद्यालय नुकतंच नावारूपाला येत होतं. पण अभ्यासाकडे लक्ष देणं भाग होतं. मग सरांनी सांगितले की, प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी ३० प्रश्न काढायचे आणि विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत गृहपाठ म्हणून द्यायचे. मुलांनी सुट्टी संपली की ह्या वह्या आमच्याकडे द्यायच्या व आम्ही आमचे प्रश्न तपासून मुलांना चुका दाखवून दुरुस्त करायला मदत करायची; मग काय पूर्ण दिवाळीची सुट्टी मुलं अभ्यासात व नंतर आम्ही रोज १०/१५ वह्या घरी घेऊन जायच्या व तपासून आणायच्या. जेव्हा या ३/४ वर्षात महाविद्यालयाची मुलं बोर्डात यायला लागली तेव्हा आम्ही केलेल्या मेहनतीचे चीज झालेलं कळलं. कधीच असं मनात आलं नाही की, आम्हाला जास्तीचं काम पडतं किंवा आमचा खूप वेळ जातो. उलट हीसुद्धा एक छान सवय लागली. द्वाड मुलांना मार्गावर आणण्याकरता परवा परवा पर्यंत मी ही गोष्ट वापरली आणि मुलांनीही या गोष्टीचं चीज केलं. नंतर असं कळलं की, अंबेजोगाईला असतानाही सर विद्यार्थ्यांकडून असाच अभ्यास करून घ्यायचे. किती शिस्तबद्ध पद्धत!

त्यावेळेस विज्ञान महाविद्यालयाची एक इमारत अर्धीच बांधली होती व त्या मोकळ्या मैदानात आमचं गॅदरींग व्हायचं. फन फेअर, करमणुकीचे कार्यक्रम सर्वच या मैदानात व या सर्वांना सर जातीने हजर असायचे.

---

या हृदयीचे त्या हृदयी देता येते तोच खरा शिक्षक.

सर्वांवर करडी नजर. एकदा करमणुकीच्या कार्यक्रमात एका विद्यार्थ्याने थोडा ताळ सोडून वर्तन करण्याचा प्रयत्न केला. जागेवरून उठून, स्टेजवर जाऊन सरांनी त्या विद्यार्थ्यास समज देऊन हाताला धरून खाली आणले व नंतर आपल्याजवळ सोफ्यावर बसवून समजावले. त्या दिवशी हे मवाळ व्यक्तिमत्त्व किती करारी कणखर होऊ शकते हे कळले व त्यांच्या समोर कुठल्याही मर्यादांचे उल्लंघन होता कामा नये हा धडाही हजर असलेल्या सर्वांना मिळाला. सर्व कारकीर्दीत उपयोगीही पडला.

सरांच्या अशा कित्येक लहान मोठ्या आठवणी मनात घर करून बसल्या आहेत आणि आजही पथदर्शक म्हणून मदत करत आहेत. महाविद्यालयाच्या पहिल्याच वर्षी सर्व विद्यार्थ्यांची माथेरानला सहल न्यायची होती. सरांनी आम्हा ४/५ जणींना बोलावले आणि जबाबदारी दिली. मनातून आम्ही थोड्या धास्तावलो होतो. पण सर म्हणाले की, अगं सर्व विद्यार्थी खरंच खूप छान असतात आणि त्यांना शिक्षकांविषयी प्रेमही असतं, आदर असतो. काळजी करू नका. तेच तुमची काळजी घेतील. सरांवर पूर्ण विश्वास. त्यामुळे तयार झालो आणि गेलो. माथेरान चढताना काहीबाही कानावर येत होतं. परत धास्तावलो. सर्व विद्यार्थ्यांशी एक-एक करून बोललो. जेवण झाल्यावर सर्वजण आले आणि म्हणाले, मॅडम कॅम्पफायर करू या आणि रात्रभर त्यांच्याभोवती बसू या. तुमच्या समोरून आम्ही हलणार नाही आणि खरंच सर्वजण आमच्या सोबत बसले. दुसरे दिवशी परत गेल्यावर सरांना सर्व प्रसंग सांगितला. सरांनी परत एक आश्वासक हास्य केलं आणि म्हणाले की, अगं आपल्या आयुष्यात हीच कमाई आहे, विद्यार्थ्यांचं प्रेम आणि विश्वास. त्यांना घडवणं आपलं काम आहे. मनापासून केलंत तर अपयश येणारच नाही. खरंच सर आम्ही आयुष्यभर ही पुण्याई जपली. आज हजारो विद्यार्थी जेव्हा वेगवेगळ्या निमित्ताने भेटतात, आठवणी काढतात तेव्हा कळतं की, आपण किती श्रीमंत आहोत, किती समृद्ध आहोत.

सरांबरोबर महाविद्यालयात फक्त चारच वर्ष मिळाली. नंतर सर १९८० साली रिटायर झाले. पण त्यानंतरही ते शांत बसले नाहीत. सरस्वती मंदिर शाळेच्या श्री. टिळकसरांबरोबर त्यांनी 'प्रज्ञा शोध मंडळ' चालू केले. आम्हाला बोलावले, सभा घेतली, मानस सांगितला. ठाण्यात इतकी हुशार मुलं आहेत. त्यांच्याकरता आपण काहीतरी केले पाहिजे असं त्यांना वाटत होतं. म्हणून या प्रज्ञा शोध मंडळाची स्थापना झाली. शनिवार आणि रविवार या दोन दिवशी या मुलांना शिकवायचे. मुलं कितवीची?- तर ६ वी व ९ वीची. भाभा संशोधन केंद्रातर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांकरता या मुलांना तयार करायचे. दर शनिवारी संध्याकाळी ४ ते ६ या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले आणि खरंच खूप मजा यायला लागली. छोटी छोटी ती मुलं त्यांच्या शंका जेव्हा विचारायची तेव्हा अवाक व्हायला व्हायचे आणि त्यातून आमचे अधिक वाचन व्हायचे. आज या प्रज्ञाशोध केंद्रातून बाहेर पडलेली २०/२५ मुले तरी आज वेगवेगळ्या देशांत संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. किती व्यासंगी व्यक्तिमत्त्व होतं सरांच! ते शिक्षकी पेशा पूर्णपणे जगले आणि आम्हाला जगायला शिकवले. सतत या शिक्षणाकरता वेगळे विचार, वेगळे उपक्रम! रिटायर झाल्यावरही पुढची १० वर्षे ते या प्रज्ञाशोध मंडळात भेटत राहायचे. शनिवारी महाविद्यालयाचे काम आटोपून तिथे जाईस्तोवर ते बसलेले असायचे. 'चहा घे ग, दमून आली आहेस' असं म्हणून कपभर चहा प्यायला लावायचे. खरंतर वयामध्ये-मानामध्ये केवढे अंतर! पण कायमच मुलीसारखे प्रेम केले, छानसं हसून कौतुकही केले.

सर डहाकेवाडीत सरस्वती शाळेजवळच रहायचे. माझे माहेरही तिथलेच. पुढे सर निवृत्त झाल्यावर सरांच्या

घरी जाणे-येणेही सुरू झाले. खिडकीजवळ एक टेबल खुर्ची आणि तिथे बसलेले पांढऱ्या शुभ्र वेशातील सर मनात ठसले. कधी तरी कांदा पोहे, तर कधी तरी चहा बिस्किटे. याबरोबर पुढच्या योजनांबद्दल सर बोलायचे तन्मयतेने, अभ्यासपूर्वक.

अशीच एक योजना त्यांनी महाविद्यालयात असताना सुरू केली होती. 'College-School Complex' 'महाविद्यालय शाळा समूह'. या योजनेचा मूळ गाभा असा होता की, महाविद्यालयाच्या आसपास असलेल्या शाळांना मदतीचा हात द्यायचा, शाळेतील मुलांना महाविद्यालय भेटीसाठी बोलवायचे. त्यांच्याकरता विज्ञानाधारित कार्यक्रम करायचे, प्रयोगशाळा दाखवायच्या; की जेणे करून या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात यावेसे वाटेल.

आमच्या विभागाचे प्रमुख ठाकुर सर यांनी ही योजना पुढे चालू ठेवली व आम्ही ती आजतागायत राबवली. आजही ६वी / ९वीचे भाभा संशोधन परीक्षेस बसणारे विद्यार्थी महाविद्यालयात प्रयोगशाळा बघायला, तिथे केले जाणारे प्रयोग अभ्यासायला येतात. राष्ट्रीय स्तरावर काही प्रकल्प सादरीकरण करायचे असतील तर त्या शाळा महाविद्यालयाशी संपर्क साधतात व शिक्षक त्यांना मदत करतात. अशा कित्येक प्रकल्पांना राष्ट्रीय पातळीवर बक्षिसे मिळतात. पर्यावरण विभाग हा आमच्या महाविद्यालय परीसरात शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतो.

किती दूरदर्शी व्यक्तिमत्त्व होते सरांचे. संपूर्ण अभ्यास करूनच प्रकल्प मांडायचा व आपण स्वतः त्याचा एक भाग व्हायचं. म्हणूनच सरस्वती शाळेत चालू झालेलं प्रज्ञाशोध केंद्र असो, की आमच्या महाविद्यालयातील महाविद्यालय शाळा समूह. अजूनही ४० वर्षे या योजना चालू आहेत.

१९९० साली सर निवर्तले. एक तपस्वी काळाच्या पडद्याआड गेला. पण माझ्यासारखे कित्येक शिक्षक तयार करून गेला. अतिशय धिरोदात्त व्यक्तिमत्त्व, शांत स्वभाव, आश्वासक नजर, अगदी लहान वयाच्या आमच्या सारख्या शिक्षकांना समजून घेण्याचा स्वभाव, प्रचंड व्यासंगी व्यक्तिमत्त्व; खूप खूप पैलू होते सरांचे.

जेव्हा २००३ साली मी प्राचार्य झाले तेव्हा प्राचार्यांची खोली बदलली होती, खुर्चीही बदलली होती. पण ते पद हे नाडकर्णी सरांनी भुषवलेले होते. त्यामुळे मनात त्यांनी घालून दिलेले धडे ठेवूनच प्राचार्यपदाचा स्वीकार केला व त्या धड्यांवर चालण्याचा प्रयत्न केला. त्यांचा शांतपणा मात्र कधी अंगिकारू शकले नाही.

माझ्याकरता नाडकर्णी सर कायमच दीपस्तंभ होते आणि आहेत. त्यांची मी प्रत्यक्ष विद्यार्थी कधीच नव्हते. त्यांच्याकडून जरी मी रसायन शास्त्र कधी शिकले नाही तरी महाविद्यालयीन जीवनाची केमिस्ट्री मात्र नक्की शिकले.

अशा या आदरणीय व्यक्तिमत्त्वाला शतशः प्रणाम!

**– माजी प्राचार्या डॉ. सौ. माधुरी पेजावर**

•••




ए.एस.सी. कॉलेज कॉमर्स असोशिएशन आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे जे. पी. खंडेलवाल (१९७४-७५)

स्पर्श न करता विद्यार्थ्याला शिक्षा करता येते तोच खरा शिक्षक!

# 'दां'ना आठवताना...

जेंव्हापासून मला कळायला लागलं तेव्हापासून मी माझ्या वडिलांना 'दा' अस संबोधायला लागलो. माझी मोठी बहीण आणि मोठा भाऊ त्यांना 'दादा' म्हणायचे. तेच त्यांचे कुटुंबामधलं नाव होतं. म्हणजे कुटुंबामध्ये त्यांना 'दादा मामा', 'दादा काका' अशाच नावाने ओळखले जायचे. पण मी हा शॉर्टफॉर्म करून टाकला. अगदी लहान असतानापासूनची काही दृश्ये नेहमी माझ्या डोळ्यांसमोर येत असतात. माझा जन्म झाला तेव्हा दा जळगावच्या एम.जे. म्हणजेच मुळाजी जेठा महाविद्यालयामध्ये केमिस्ट्रीचे प्राध्यापक म्हणून काम करत होते. त्याचवेळी महाविद्यालयाच्या वसतिगृहाचे ते रेक्टर होते. या रेक्टरशिपची जबाबदारी त्यांच्यावरती असल्यामुळे महाविद्यालयाच्या विस्तीर्ण अशा परिसरामध्ये आम्हाला छोटासा बंगला दिला गेला होता. तिथेच माझा जन्म झाला. माझा भाऊ आणि माझी बहीण आणि मी यांच्यामध्ये जवळजवळ एका तपाचे अंतर आहे. माझे आई-वडील कधी कधी मला गंमतीने म्हणायचे की, तूच आमचे एकमेव प्लॅन्ड चाईल्ड आहेस. म्हणजे त्या दोघांनाही तिसरे मूल हवं होते. पण त्यासाठी त्यांची आर्थिक परिस्थिती सुस्थिर होईल तेव्हाच हा निर्णय घ्यायचा असं त्यांनी ठरवलं होतं. मला कळायला लागले तेव्हापासून माझं बालपण या परिसरामध्ये गेलं. रात्रीच्या वेळेला आमची जेवणं झाली की वडील वसतिगृहाच्या राऊंडसाठी रोज बाहेर पडायचे आणि तास-दीडतास लागायचा त्यांना. नऊला गेले तर कधी अकराला यायचे. एका टोकाला वसतिगृह, दुसऱ्या टोकाला आमचं घर. मधल्या अंधारामधून ते येत आहेत ते कळायचे. कारण त्यांच्या टॉर्चचा हलणारा प्रकाश. मी त्यांना विचारायचो की, 'तुम्ही रोज मला इथे सोडून रात्री जेवल्यानंतर का तिथे जाता?' तेव्हा ते मला म्हणायचे, 'अरे रात्री तुझ्याबरोबर झोपायला आणि तुला कुशीत घ्यायला मी येतो ना. पण तिथे केवढे सगळे दादा राहतात, ते त्यांच्या आईबाबांपासून दूर राहतात. त्यांना त्यांच्या आईबाबांची आठवण होत असेल, त्यांच्याकडे जाऊन नको का बघायला?' मग मी त्यांच्या चेहऱ्याकडे बघायचो आणि त्यांचं मायाळू हास्य नजरेमध्ये साठवत त्यांचेच बोट धरून झोपायला जायचो. उन्हाळ्याचे दिवस असायचे, आम्ही आमच्या बंगल्याच्या गच्चीवरती गाद्यांना गाद्या टेकवून झोपायचो. मग तिथे आमचे दा आम्हाला आकाशदर्शन घडवायचे. वेगवेगळ्या नक्षत्रांची माहिती द्यायचे. ग्रह ताऱ्यांच्या गंमती सांगायचे. वाहणाऱ्या आकाशगंगेला पाहत असताना विश्वाची उत्पत्ती कशी झाली तेही साध्या शब्दात सांगायचे. आमच्या त्या बंगल्याच्या अंगणामध्ये खूप फुलझाडे होती. रात्रीच्या वेळेला त्या सगळ्यांचे वास भरलेले असायचे. त्या गच्चीच्या वातावरणात आणि दांना बिलगून जेव्हा हे आकाशदर्शन व्हायचे तेव्हा दूरवरच्या सातपुड्यावरून येणारी कोल्हेकुईसुद्धा ते तिचे भीषणपण गमावून बसायची. ते हौशी होते. त्यामुळे पौर्णिमेच्या रात्री कधी घरी केलेले आटवलेले दूध, उन्हाळ्यामध्ये थंड थंड कलिंगड अशा सगळ्या पदार्थांची रेलचेल असायची. सगळ्या कुटुंबाने एकत्र बसायचं, एकत्र खायचं, गप्पा मारायच्या हा आमच्याकडे परिपाठच होता. जळगावहून विद्यापीठाच्या सभांसाठी त्यांना पुण्याला जावं लागायचं. येताना ठरलेला खाऊ होता तो म्हणजे पुस्तकं. माझ्या भावा-बहिणींची शेकडो पुस्तकं वारशाने माझ्याकडेच आली आणि त्यामध्ये मी माझ्या पुस्तकांची भर घातली. या सगळ्या पुस्तकांचा प्रॅक्टिकल असा उपयोग दा करायचे. म्हणजे कसा? जर समजा गांधीजींवरची पुस्तके आहेत, तर आमच्याकडे

२ ऑक्टोबर हा सणासारखा साजरा व्हायचा. त्या दिवशी आम्ही एक आरास करायचो. तिकडे गांधीजींचा पुतळा असायचा. त्याच्या बाजूला त्यांची पुस्तके ठेवलेली असायची. असेच सण हे सगळ्या देशभक्तांच्या वाढदिवशी व्हायचे. म्हणून आमची सणांची कल्पना ही एका धर्मापुरती मर्यादित नव्हतीच. प्रत्येक सणाला आरास करायचे ते टेबलावरती आणि ती आम्ही सगळेजण करायचो. मग या राष्ट्रीय सणांच्याबरोबर म्हणजे २६ जानेवारी, १५ ऑगस्ट याच्याबरोबर हे महापुरुषांचे वाढदिवस आणि स्मरण दिन असायचे. बौद्धपौर्णिमा पण साजरी व्हायची आणि ख्रिसमससुद्धा! मोठी गंमत होती. आमच्या घरामध्ये प्रत्येक सण पाहुणा यायचा. प्रत्येक सणाच्या बरोबर होणारा ऋतुबदल आमचे दा आम्हाला समजावून सांगायचे आणि त्यानिमित्ताने आपल्या आहार-विहारात होणारे बदलसुद्धा अगदी साध्या शब्दांत आम्हाला सांगायचे. संस्कार म्हणून काही वेगळे असतात ते आम्हाला कधी त्यांनी जाणवूनच दिले नाही. या मोकळ्या वातावरणामध्ये मी वाढत होतो आणि वयाच्या अडीच-तिसऱ्या वर्षापासूनच वाचायला शिकलो. चौथ्या वर्षापासूनच लिहायला शिकलो म्हणून जेव्हा शाळेत जायची वेळ आली तेव्हा तो मला माझ्या मुक्त जीवनावरचा भारच वाटला. म्हणून मी बंद पुकारला. मला शाळेत नाही जायचं. आमच्या केमिस्ट्री डिपार्टमेंटमध्ये काम करणारे पाटीलकाका होते. त्यांच्यावरती मला सायकलने शाळेत सोडायची जबाबदारी होती. दा नी मला सांगितले की, तुला पाटीलकाकांच्या बरोबर सकाळी फक्त फिरून यायचे आहे. मी तुला शाळेत पाठवणार नाही. एवढे सांगितल्यावर मी म्हटले 'वा! मग काही हरकत नाही', तरीसुद्धा थोडासा संशय होताच की, हे खरं बोलतायत की खोटं? पण मी त्या पाटील काकांच्या बरोबर सायकलवरून निघालो. पुढचे जवळ जवळ १० दिवस पहिल्यांदा दीड तास, मग दोन तास, मग अडीच तास, मग तीन तास ते मला पंचक्रोशीमध्ये फिरवून आणायचे. कधी-कधी आम्ही जवळच्या मेहरुनच्या तलावावरती जायचो. कधी गिरणा नदीच्या काठी असलेल्या पंम्पिंग स्टेशनवरती जायचो, तर कधी रेल्वे क्रॉसिंगला जाऊन गाड्यांची वाहतुक न्याहाळायचो. होता होता ८-१० दिवस झाले. मग वडील म्हणाले, 'अरे जाताना डबा घेऊन जात जा'. अजून दप्तराचं कोणी काही बोललं नव्हतं आणि डबा was a good praposition! मग मी आणि पाटीलकाका डबा खायचो. मग पाटीलकाका एकदा म्हणाले की, 'अरे आपण दोघंच डबा खायचा तर आपण असं करू शाळेमध्ये डबा खायची वेळ येते ना तेव्हा तिकडे जाऊन सगळ्यांच्या बरोबर डबा खाऊ.' मला ही कल्पना आवडली. हा सगळा दांच्या प्लॅनचा भाग होता. हे कळण्यासारखे माझं वय अर्थातच नव्हते. मग आम्ही मधल्या सुट्टीमध्ये गेलो. शाळेमध्ये सगळ्यांच्या बरोबर बसून डबा खाल्ला. माझ्या लक्षात आले की, शाळा एवढी वाईट नसावी. कारण इतके जण आनंदाने डबा खात आहेत. मी पाटीलदादांना म्हणालो, '१० मिनिटं थांबूया का सुट्टी झाल्यानंतर?' तर मोठ्या गंभीर चेहऱ्याने पाटीलदादा म्हणाले, सरांना विचारायला हवं. अरे बापरे! मग मी जरासा नाखूश होऊन शाळेतून बाहेर पडलो. मग जाताना ते मला म्हणाले की, सरांना विचारू आणि उद्या काय करायचे ते ठरवू. मग माझ्या लक्षात आलं की, एकदा गेलो आपण की बसायला लागेल. पण त्याचवेळेला बसावे असंही वाटायला लागलं होते. मग मी दांना विचारले की मला शाळेत जाऊन बघावेसे वाटतंय; पण बसायची सक्ती नाही ना करणार? तर ते मला म्हणाले, ''हे बघ, मी तर तुझ्यावर सक्ती नाही करणार. पण जर तू एकदा तिथे गेलास आणि सगळी मुलं तिथे शिकत असताना एकटाच निघून आलास तर त्या मुलांना कसे वाटेल रे.'' मी म्हटले, अरे हा तर आपण कधी विचार केला नव्हता. मग मी म्हटले की, ''डबा खातो आणि

मग बसतो. चालेल का?'' मी बाईंशी बोलतो असे दा म्हणाले. ते बोलले असावेत किंवा नसावेत. कदाचित बाईसुद्धा या कटाचा भाग असणार! मग मी अर्धा दिवस बसायला लागलो आणि होता होता मी पूर्ण दिवस शाळेमध्ये कधी बसायला लागलो ते मला कळलेच नाही! आज मानसशास्त्राच्या विषयामध्ये काम करत असल्यामुळे मला समजते की, दांनी माझ्यावरती चक्क Behavior Therapy चा यशस्वी प्रयत्न केला होता. त्यांची शैलीही अशी होती. अतिशय निर्मळ, अतिशय साधी आणि त्याच्यामध्ये कोणताही पवित्रा नसायचा. जे डावपेच काही असतील ते तुमच्या भल्यासाठीच असायचे.

या सगळ्या कालावधीमध्ये माझ्या लक्षात आलं की, माझ्या वडिलांनी काही तत्त्वे पाळली होती. कॉलेजमध्ये शिकवण्याचे जेवढे पैसे मिळायचे त्याच्यापेक्षा एकही पैसा शिकवण्यासाठी ते घ्यायचे नाहीत. अनेकांना ते शिकवायचे. कॉलेजच्या वेळाव्यतिरिक्त या विषयावरून कधीकधी ते आणि माझी आई यांच्यात वादविवादही व्हायचे. त्यांच्या स्वतःच्या कुटुंबाच्या काही जबाबदाऱ्या त्यांच्यावरती होत्या. त्या यथाशक्ती ते पार पाडतच होते. पण माझ्या आईच्या कुटुंबामधली माझी मावशी आणि मामा यांच्या शिक्षणाची जबाबदारीसुद्धा त्यांनी त्या काळात उचलली आणि यशस्वीरित्या पारही पाडली. त्यांच्यातले पालकत्व खूपच मृदू होई. नंतरच्या काळामध्ये मला पोलिओ झाला आणि माझ्या दोन्ही पायांना कॅलिपर्स लागले. तेव्हा त्या कठीण कालखंडामध्ये दा आणि माझी आई यांनी मला सतत एक गोष्ट सांगितली की, तुझ्यासमोर आलेली अडचण तर आहे, तुला अनेक गोष्टी करता येत नाही आहेत; पण तुला कोणत्या गोष्टी करता येत आहेत त्याचा विचार कर. म्हणून तर पुढे मला खेळताही येत नव्हते आणि PT च्या शारीरिक शिक्षणाच्या तासाला मला बघ्याची भूमिका घ्यायला लागायची आणि त्याचं वाईट वाटायचे. तेव्हा माझ्या डोक्यात शक्कल आली की, वेगवेगळ्या खेळांची कॉमेंट्री का करू नये आणि नंतरच्या काळात मी जवळजवळ आठ खेळांची कॉमेंट्री करू लागलो आणि शाळेच्या प्रत्येक क्रीडामहोत्सवाचा अविभाज्य घटक बनलो. हे सारे चातुर्य दांनी आणि आईने दिलेल्या वृत्तीमुळेच आलं. माझ्या या कॅलिपर्सच्या दिवसात माझ्या उपचारासाठी दांनी आणि आईने खूप चकरा मारल्या. वेगवेगळ्या हॉस्पिटल्समध्ये आणि स्पेशालिस्टकडे. पण त्यांची काळजी त्यांनी माझ्यापर्यंत कधी पोहोचू दिली नाही. मला वाटते हे त्यांच्या शैलीचे वैशिष्ट्य होते. त्यांनी आम्हा तिघाही भावंडांना स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे घडू दिले. गंमतीची गोष्ट, पुढे मोठा झाल्यावरती 3rd MBBS ला असताना मी एका परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालो! अतिशय महत्त्वाच्या परीक्षेमध्ये. त्यानंतर पुढे उत्तीर्ण झालो चांगल्या मार्कांनी. पण गंमत बघा; मला ही गोष्टच माहिती नव्हती; खूप वर्षांनी कळली की मी जेव्हा अनुत्तीर्ण झालो तेव्हा माझ्या एका आत्त्याकडे ते गेले होते आणि तिथे त्यांनी विलक्षण शांतपणे ही बातमी सांगितली की, यावर्षी 3rd MBBS च्या परीक्षेमध्ये आनंद नापास झाला. पण तो वेगळा मुलगा आहे. तो नेहमीच्या पद्धतीने यशस्वी होणारा नाही आहे. परंतु यशस्वी होईल, त्याची मला खात्री आहे. हे माझ्या आतेबहिणीने कित्येक वर्षांनंतर मला सांगितले की, ''अरे तुला जेव्हा अशाप्रकारचे अपयश आले होते, त्याच्याकडे दादामामा म्हणजे तिचे ते मामा, अशा दृष्टीकोनातून पाहात होते.'' सहजपणे पाहात होते. त्यांनी दिलेल्या या अपयशानंतरच्या धीरामुळेच मी पुन्हा एकदा यशाकडे जाऊ शकलो. या संपूर्ण वाटचालीमध्ये त्यांनी मला त्यांच्यामधली मूल्ये कशी दिली हे कधी कळलेच नाही. ११वीच्या नंतर जेव्हा बांदोडकर महाविद्यालयामध्ये मी विद्यार्थी म्हणून गेलो त्यावेळेला Organic Chemistry हा विषय एखाद्या गाण्याच्या मैफिलीप्रमाणे कसा शिकवला जातो हे

दांच्याकडून शिकलो. शिकवताना ते विलक्षण तन्मय असायचे. पहिल्यांदा वर्गामध्ये प्रवेश केला की सगळा फळा छान पुसून घ्यायचे. नंतर तो अख्खा खडू हातात घेऊन त्याचे टोक थोडेसं तोडायचे म्हणजे बरोबर योग्य त्या पद्धतीने ते, योग्य त्या व्यासातच तो खडू फळ्याला भिडला पाहिजे. माझ्या असं लक्षात आलं की, खूप वर्षांनंतर मी जेव्हा शिकवायला लागलो तेव्हा, जेव्हाजेव्हा फळा आला समोर, तेव्हा पहिल्यांदा मी तसाच पुसायचो आणि नंतर तो खडू तसाच वापरायचो आणि तसाच उडवायचो सुद्धा. जणू काही माझ्या मनाने शिकवण्याच्या प्रवासाच्या आधी केलेली ती गुरूवंदनाच असली पाहिजे. Organic Chemistry शिकवताना ती समीकरणे आणि त्या समीकरणामागचा इतिहास हे ते रंगून शिकवायचे. हे शिकवण्यासाठीच्या त्यांच्या नोट्स होत्या. त्या फुलस्केप कागदाचे चार भाग करून त्याची छोटी वही बनवून प्रत्येक विषयाच्या नोटस् असायच्या. उजव्या हाताला लिहिलेले असायचे. डावी बाजू त्या कागदाची कोरी असायची. का? कारण त्यांनी एखाद्या विषयाच्या नोटस् तयार केल्या की मधल्या काळामध्ये त्या विषयावर ते जे काही वाचायचे ते सगळे संदर्भ ते डाव्या हाताला लिहायचे. ती वही अशी असायची की, ती त्यांच्या शर्टाच्या खिशात राहायची. वही भरली की साधारणपणे मे महिन्यामध्ये वह्या नवीन करण्याचा आणि स्वतःच्या हस्तक्षरामध्ये पुन्हा लिहून काढायचे असा त्यांचा पायंडा होता. अशा साधारण ७०-८० छोट्या वह्या त्यांच्याकडे असायच्या. ज्या दर वर्ष दोन वर्षांनी नव्या आवृत्तीमध्ये निघायच्या. बरं; त्या दिवशी जी Lectures असतील त्याची छोटी वही काढून त्याच्यावरून नजर फिरवायला ते विसरायचे नाहीत. मी त्यांना विचारले की, ''दां इतके वर्ष शिकवताहेत. तुम्हाला काय भीती वाटते का काही विसराल म्हणून''. तेव्हा ते माझा मिश्किलपणा जाणून तसेच हसले आणि म्हणाले, ''नाही रे. अगदी तसंच नाही, पण काय असते बघ, समोरची मुलं प्रत्येक वेळेला वेगळी. मी सुद्धा प्रत्येक वेळेला वेगळा. मग सगळेच जर वेगळे असेल तर एकदा प्रॅक्टीस करायला काय हरकत आहे!'' ही त्यांची शैली होती. ते आपल्याला इतक्या साध्या पद्धतीने सांगायचे की, आपल्याला नेमकं काय कळत आहे हे त्यावेळेला कळायचं नाही. पण जे काही कळायचे ते आतमध्ये उतरलेले असायचे. त्यांचा कॉलेजमध्ये आदरयुक्त दरारा होता. पण घरामध्ये मात्र तो दरारा जाणवायचा नाही. आम्हाला फक्त त्यातले निर्मळ प्रेमच जाणवायचे. अगदी छोट्याछोट्या गोष्टींमधला आनंद कसा घ्यावा हे आम्ही त्यांच्याकडून शिकायचो. त्यांना साहित्याचेही वेड होतं. वाचन चौफेर होते आणि गोष्टी समजून सांगायची हातोटीसुद्धा होती. त्यांनी स्वीकारलेली जीवनशैली ह्या विषयावरून त्यांचे आणि माझ्या आईचे मतभेद व्हायचे. पण त्या मतभेदामधली कटुता त्यांनी आमच्यापर्यंत कधीच पोहोचवली नाही. होता होता मी MBBS झालो आणि मनोविकारशास्त्राच्या शाखेमध्ये प्रवेश करायचे ठरविले. तेव्हा माझ्या आईने कडाडून विरोध केला. तिला असे वाटत होते की, आपल्या मुलाने वेड्यांचा डॉक्टर बनू नये. पण दा मात्र अतिशय खंबीरपणे माझ्या पाठीशी उभे राहिले होते त्यावेळी. नंतर अर्थात आईचा पूर्वग्रहसुद्धा बदलला आणि MD चा अभ्यास सुरू असताना मी मला काय करायचेय आयुष्यात ह्याचे एक स्वप्न लिहिले. ते साल होतं १९८१ आणि मी त्यामध्ये असे लिहिले होते की, 'मानसिक आरोग्य आणि समाज ह्यांच्यामधली दरी दूर करणारी एक संस्थाच मला तयार करायची आहे' आणि आज ज्या संस्थेमध्ये मी काम करतो तेच नाव म्हणजे I.P.H. असंच त्या संस्थेचं नाव होतं. फक्त आपल्या संस्थेचे नाव Institute for Psychological Health आहे. ८१ साली मी लिहिताना ते I.P.H. म्हणजे Institute of Psychologically Handicapped असं लिहिलं होते. कारण त्या काळामध्ये ती परिभाषा रूढ होती. पुढे ९०

शिक्षण हे खूप शक्तीशाली हत्यार आहे, तुम्ही त्याने जग बदलू शकता.


सालापर्यंत १० वर्षांमध्ये माझ्या विचारातही फरक पडला आणि Institute for Psychological Health असं नाव झाले. हे माझे स्वप्न एका रात्री लिहून काढले K.E.M. मध्ये काम करत असताना आणि त्या आठवड्याला Hostel मधून ज्यावेळेला घरी आलो तेव्हा दांच्या हातात ते दिलं. त्यांना म्हटले, ''मला हे करायचं आहे आयुष्यात.'' त्यांनी ते वाचले आणि मला म्हणाले, ''माझ्या टाइपरायटरवरती तुला छान पैकी टाइप करून देतो.'' हाच त्यांनी मला दिलेला आशीर्वाद होता. त्या नंतरच्या काळामध्ये माझ्या प्रवासामध्ये 'व्यसनाधीनता आणि व्यसनमुक्तीचे आंदोलन' आले. त्या कामामध्ये मी मग्न झालो. K.E.M. मध्ये असताना आणि ८६ साली K.E.M. मध्ये असलेली नोकरी सोडून स्वतःचा व्यवसाय करण्याचाही निर्णय घेतला. तो निर्णय घेताना मी त्यांच्याशी बोललो होतो की, मला जो व्यवसाय करायचा आहे तो आमच्या डॉक्टरी व्यवसायात असलेल्या कोणत्याही गैरप्रकारापासून दूर राहून करायचा आहे. त्याच्यावर त्यांनी पसंतीदर्शक मान हलवली होती. माझ्या खाजगी प्रॅक्टीसच्या पहिल्या दिवसापासून माझ्याकडे येणारी जेवढी काही कॅश असायची ती मी त्यांना द्यायचो आणि ते माझा दररोजचा हिशोब लिहून ठेवायचे. त्यानंतर जे काही सी.ए.कडे जायचे असते, अकौंट ठेवायचे असतात ते काम मोठ्या हौशेने करायचे आणि साधारण १० महिन्यांनंतर माझ्या प्रायव्हेट प्रॅक्टीस मधून मला मिळणारे पैसे हे १०,००० रुपये झाले. त्या काळामध्ये ह्याचा त्यांना इतका आनंद झाला की, ते म्हणाले, ''अरे खूप चांगली प्रॅक्टीस करून १० महिन्यांमध्ये तुला महिन्याला १०,००० रुपये मिळताहेत. खूप झालेत आपल्यासाठी'' तर मीपण हसलो. मी म्हणालो, ''हो खूप झाले आपल्यासाठी.'' पैशांकडे कसे बघावे हे त्यांनी त्यांच्या वागण्यातून, त्यांच्या आचरणातून मला आणि आम्हा भावंडांना शिकवलं. कसे रहावे हे सुद्धा शिकवले. पण त्यांच्यातला साधेपणा माझ्यामध्ये मुरायला खूप वर्षे गेली. १९९० साली ते गेले त्या वेळेला या I.P.H. संस्थेची स्थापनासुद्धा झालेली नव्हती. म्हणजे जे स्वप्न त्यांनी त्यांच्या टाइपरायटरवरती टाइप केलं ते प्रत्यक्षात येताना पाहायला मात्र ते नव्हते. मात्र त्यांचे आशीर्वाद सतत होते, आजसुद्धा असतात. ते गेल्यानंतर जवळजवळ ३ वर्षांनी माझा एक वर्गमित्र भेटला, बांदोडकर कॉलेजमधला. तो मला म्हणाला, 'सर गेल्याचे मला कळले आणि मी ठरवले की सरांची रोज आठवण राहील असे मी काहीतरी करणार आहे आणि त्या दिवसापासून मी पूर्ण खादी वापरायला लागलो आहे.' त्यांना जाऊन ३ वर्षे झाली होती. माझ्या मनात असा विचार आला की, अरे या त्यांच्या विद्यार्थ्याला त्यांची जाण्याची बातमी कळल्याबरोबर जे समजले ते मला का नाही समजले? पण मी म्हटलं 'ठीक आहे, आजपासून मी हे करेन.' तेव्हापासून माझा वेश बदलला. तेव्हापासून आजपर्यंत मी खादी वापरायला लागलो. मी शर्ट-पँट सोडून दिली. ह्याच्यामागे फक्त पेहरावाचा फरक होता असं मला वाटत नाही. त्या दिवसापासून खरं तर त्यांची मूल्य, त्यांची जीवनपद्धती माझ्यामध्ये मुरवण्याचा माझा एक साधक म्हणूनच प्रयत्न सुरू झाला आणि तो प्रयत्न अजूनही थांबलेला नाही. मला खूपवेळा असा प्रतिसाद मिळतो की, जरी तू शिक्षण क्षेत्रात नसलास तरी तू इतक्या जणांना इतक्या पद्धतीने शिकवतोस की, तू तुझ्या वडिलांचा वारसा पुढे चालू ठेवला आहेस. एका ठिकाणी मला समाज-शिक्षक नावाचा पुरस्कार मिळाला. तिकडे त्या पुरस्कार देणाऱ्यांनीही दांच्या वारशाचा उल्लेख केला. तेव्हा त्यांचा शिकवण्याचा वारसा आपण पुढे नेला आहे ह्याचा मला खूप आनंद झाला आहे, होत असतो. शिकवताना मी जेव्हा तंद्रीमध्ये जातो तेव्हा ते कुठेतरी माझ्यात असतात असा अनुभव मी घेतो! मी जेव्हा निर्मळपणे, तत्परपणे कोणालाही मदत करत असतो तेव्हा माझ्या मागे माझ्या 'आतच' त्यांचा प्रेमळ हसरा

ज्ञानाने, मानाने आणि मनाने इतके मोठे व्हा, की भाग्यवान शब्दाचा अर्थ तुमच्याकडे बघून समजेल.

चेहरा असतो. तो मी अनुभवत असतो आणि ज्या वेळेला मानवी मूल्यांशी तडजोड न करता ठामपणे उभं राहण्याची वेळ येते तेव्हा तर ते माझ्यामध्ये पूर्ण भिनूनच गेले आहेत असा अनुभव मला येत असतो. त्यांचे हे जन्मशताब्दीच वर्ष. ह्या वर्षामध्ये आठवणींची आळवणी आणि उजळणी करायला बसलो तर किती वेळ जाईल त्याची गणतीच करता येणार नाही. पण त्यांनी जे मला दिले, तितक्याच निर्मळतेने आणि सहजतेने त्यांनी ते हजारो विद्यार्थ्यांना दिले. म्हणून विनोबा त्यांच्या वडिलांबद्दल जे म्हणाले ते मला माझ्या दांबद्दलसुद्धा म्हणावंसं वाटतं की ''जगामध्ये अप्रसिद्ध असे जे अनेक थोर पुरुष होऊन गेले त्याच्यामध्ये माझे वडील एक होते.'' खरंच सांगतो तुम्हाला, माझे दा अगदी तसेच होते...

**– डॉ. आनंद नाडकर्णी**

•••




डिप्लोमा इन बिझिनेस मॅनेजमेंट आयोजित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डी. आर. प्रधान (१९७४-७५)



डॉ. वा. ना. बेडेकर आणि प्रा. नाडकर्णी यांची विज्ञान प्रदर्शनाला भेट (१९७५-७६)

# ग्रामीण महाविद्यालयांसाठी एक उपक्रम महाविद्यालय शाळा समूह

स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या गेल्या वीस-बासीस वर्षांत आपल्या देशांत शिक्षणाचा प्रसार व विस्तार बराच झाल्याचे दिसून येते. विशेषतः प्रादेशिक विद्यापीठांची स्थापना झाल्यानंतर तर त्यास अधिकृत वेग येऊन ग्रमीण भागांत फार मोठ्या प्रमाणावर माध्यमिक शाळा सुरू झाल्या. तथापि त्यामुळे शिक्षणाचा विस्तार झाल्यासारखा दिसला तरी एकंदर शिक्षणाची खोली न वाढता, उलट सर्वसाधारण दर्जा खालावलेलाच दिसतो. याचे प्रमुख कारण म्हणजे ज्याप्रमाणांत माध्यमिक शाळांची वाढ झाली. त्या प्रमाणात या शाळांना प्रशिक्षित शिक्षकवर्ग व शिक्षण साहित्य उपलब्ध होऊ शकले नाही.

या परिस्थितीचा विचार करून कोठारी शिक्षण आयोगाने ग्रामीण भागातील शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी शिक्षणक्रमांतील विविध स्तरांच्या दरम्यान अधिक चांगल्या तऱ्हेचे संयोजन साधावे व ग्रामीण भागांतील विद्यापीठे व महाविद्यालये यांनी अनेक विविध उपाय योजून आपल्या परिसरांतील शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यास सहाय्यभूत व्हावे या उद्देशाने 'शाळा समूह'ची कल्पना पुढे मांडली.

महाराष्ट्र राज्याच्या शिक्षणविषय श्वेतपत्रिकेत देखील या योजनेचा अंतर्भाव आहे. किंबहुना श्वेतपत्रिकेतील एक अत्यंत महत्त्वाची व उपयुक्त अशी ही योजना आहे. परंतु दुर्दैव असे की त्यावेळी शिक्षक, सामाजिक व राजकीय नेत्यांच्या श्वेतपत्रिकेचा विचार करण्यासाठी झालेल्या सभा, परिषदा, परिसंवाद अगर चर्चासत्रांतून या योजनेचा फारसा कुणी विचार केल्याचे दिसत नाही. इतकेच नव्हे तर; महाराष्ट्र विधानसभेत श्वेतपत्रिकेवरील गाजलेल्या चर्चेत शिक्षणाचा विस्तार की गुणवत्ता यावर रंगलेल्या वादात विस्तार व गुणवत्ता यांची उत्कृष्ट सांगड घालणाऱ्या या योजनेचा उल्लेखही झाला नाही.

श्वेतपत्रिकेतील शाळा-समूहाच्या कल्पनेला अनुसरून, १९६८ च्या एप्रिलमध्ये महाराष्ट्र राज्य शिक्षण शास्त्र संस्थेने काही प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षण तज्ज्ञ यांची एक बैठक पुणे येथे बोलावली होती. त्या बैठकीत चर्चा होऊन महाविद्यालय शाळा-समूहाची योजना मांडण्यात आली. महाविद्यालयाच्या ग्रामीण परिसरांत ज्या शाळांमध्ये शिक्षकवर्ग, साहित्य व इतर सोयी याबाबत उणिवा असतील त्यांना त्या सहकाराच्या भावनेने उपलब्ध करून देऊन त्यांचा दर्जा सुधारणे हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

गेली दोन वर्षे महाराष्ट्रात फैजपूर, वाई, अलिबाग, नांदेड व अंबाजोगाई येथील महाविद्यालयांतर्फे ही योजना कार्यान्वित केली जात आहे. अंबाजोगाई येथे दोन महाविद्यालये व दहा मैलांच्या परिसरांतील १४ माध्यमिक शाळा मिळून हा समूह झाला आहे. येथील कार्याचे नियोजन व कार्यवाही याच्याशी निमंत्रक म्हणून माझा जो संबंध आला व अनुभव मिळाला, त्यावरून या योजनेनुसार हाती घेता येण्यासारख्या विविध उपक्रमांबद्दल माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहे.

**शिक्षकांची चर्चा मंडळे**

समूहांतर्गत महाविद्यालये व माध्यमिक शाळा या मधील शिक्षकांची विषयवार चर्चामंडळे (Teacher' Forum) स्थापून त्यामधून परस्पर संपर्क, अध्ययन अध्यापनातील विविध प्रश्नांबद्दल चर्चा, आधुनिक ज्ञान-विज्ञानाची देवाण-घेवाण, अध्यापनाच्या नवीन पद्धती

व त्या विषयातील प्रगत ज्ञान प्राप्त करून घेण्यासंबंधी तज्ज्ञ शिक्षकांची व्याख्याने, परिसंवाद आयोजित करता येतील. साधारणपणे भाषा विषय, गणित व शास्त्र विषय आणि समाजशास्त्र विषय अशी तीन चर्चा-मंडळे स्थापून, या मंडळाची महिन्यातून कमीतकमी एक बैठक व्हावी.

त्याप्रमाणे महाविद्यालयातील प्राध्यापक, व्याख्याते व प्रयोगदर्शक आणि मोठ्या शाळांतील अनुभवी प्रशिक्षित शिक्षक यांना ग्रामीण भागांतील मागास छोट्या शाळांमधून व्याख्याने देण्यासाठी, पाठ घेण्यासाठी अगर प्रयोग दाखविण्यासाठी जाता येईल.

समूहांतर्गत शाळांतील शिक्षकांची विषयवार व महाविद्यालयांतील व्याख्याते व प्रशिक्षित शिक्षक यांची त्यांच्या व्याख्यानाच्या व पाठाच्या विषयासहित एक सूची तयार केल्यास हे साहित्य सर्व शाळांस उपलब्ध होऊन, त्यांना या योजनेनुसार व्याख्याते व पाठ आपापल्या शाळेत ठेवता येतील.

**विज्ञान मंडळे**

समूहांतर्गत शाळांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल आवड निर्माण व्हावी, त्यांच्या आचारांत व विचारात वैज्ञानिक प्रवृत्तीची जोपासना व्हावी व त्यांच्यामधील नैसर्गिक जिज्ञासेला व प्रयोगशिलतेला प्रोत्साहन मिळावे म्हणून समूहातर्फे शाळांतून विज्ञान मंडळे स्थापन करण्यास चालना देऊन, त्याच्या कार्यात मार्गदर्शन करता येईल. महाविद्यालयातील प्राध्यापक व प्रयोगदर्शकांनी या शाळांना भेटी देऊन आधुनिक वैज्ञानिक शोध व संशोधक यांच्याबद्दल माहिती देणारी व्याख्याने द्यावीत. महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेतून उपलब्ध साहित्य घेऊन काही प्रयोगही या शालेय विद्यार्थ्यांना दाखविता येतील.

**शिक्षकांची प्रशिक्षण शिबिरे**

ग्रामीण विद्यालयातील शिक्षकांची गुणवत्ता वाढावी व त्यांना आधुनिक अध्यापन पद्धतीची माहिती व्हावी म्हणून दिवाळीच्या अगर उन्हाळ्याच्या सुट्टीत समूहातर्फे अशा शिक्षकांसाठी इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांची प्रशिक्षण शिबिरे आयोजित करता येतील. त्यासाठी महाविद्यालयातील शिक्षक, शहरातील विद्यालयातील अनुभवी प्रशिक्षित शिक्षक व विद्यापीठांचेही सहकार्य घेता येईल.

अंबाजोगाई महाविद्यालय शाळा समूहातर्फे डिसेंबर १९६८ मध्ये अविनित शासन शिक्षकांचे एक दहा दिवसांचे प्रशिक्षण शिबिर वनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालय या अत्यंत ग्रामीण भागातील शाळेत भरविण्यात आले होते. हे शिबिर म्हणजे विविध स्तरांतील शैक्षणिक संयोजनाचा एक उत्कृष्ट आविष्कार होता. त्यात केज व अंबाजोगाई या दोन तालुक्यांतील प्राथमिक व माध्यमिक शाळांतील तीस शिक्षक शिबिरार्थी विद्यार्थी म्हणून दाखल झाले होते. शिक्षक व मार्गदर्शक म्हणून अंबाजोगाई, लोहारा, येरमाळा, उदगीर, पुणे येथील अनुभवी प्रशिक्षित शिखक व योगेश्वरी महाविद्यालयातील व्याख्याते व प्रयोगवर्धक काम करीत असत. शिबिरांत रोज चार तास प्रत्यक्ष शास्त्र प्रयोगाचे काम, दोन तास प्रयोगाबाबतचे मार्गदर्शकाचे व्याख्यान अगर तत्संबंधी चर्चा होत असे. शिवाय रोज संध्याकाळी पाहुण्या व्याख्यात्यांची शास्त्रीय विषयांवर व्याख्याने होत असत. ही व्याख्याने देण्यासाठी मराठवाडा विद्यापीठांतील प्राध्यापक व योगेश्वरी विद्यालयातील प्राध्यापक व व्याख्याते यांनी शिबिरास भेटी दिल्या. त्याशिवाय रोज रात्री शास्त्रीय विषयावरील चित्रपट दाखविण्यात येत होते. त्यासाठी पुणे विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ व फिल्म डिव्हिजन यांजकडून चित्रपट मिळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने अत्यंत ग्रामीण भागांत विद्यापीठे व महाविद्यालये त्यांच्या सहकार्याने हा शैक्षणिक संयोजनाचा उत्कृष्ट प्रयोग कार्यान्वित केला गेला.

### विज्ञान नैपुण्य शोध योजना

केंद्रीय शासनाने सुरू केलेली 'विज्ञान नैपुण्य शोध योजना' कार्यान्वित करण्याच्या दृष्टिनेही महाविद्यालय शाळा समूहास बरीच उपयुक्त कामगिरी पार पाडण्यासारखी आहे. या परीक्षांच्या गेल्या चार-पाच वर्षांतील निकालांचा आढावा घेतला तर त्याबाबत महाराष्ट्राचे अपयश विदारक आहे असे आढळून आले. या निकालाचे बारकाईने पृथक्करण केल्यास असे दिसून येते की, निवडलेले बहुतेक विद्यार्थी उच्च-माध्यमिक शाळांतील आहेत. याचे कारण असे की, या विद्यार्थ्यांना या शाळांमधून सलग तीन-चार वर्षे पद्धतशीरपणे मार्गदर्शन व शिक्षण होत असते. आपल्याकडे उच्च माध्यमिक शाळा नसल्याने व ही परीक्षा महाविद्यालयातील पहिल्या वर्षअखेरीस असल्याने या विद्यार्थ्यांना पद्धतशीर मार्गदर्शन मिळत नाही. हा दुवा महाविद्यालय शाळा समूह साधू शकेल.

समूहांतर्गत शाळांतील विज्ञान मंडळामार्फत विद्यार्थ्यांना शाळेतील शेवटच्या तीन वर्षांत मार्गदर्शन करून त्यांना या परीक्षेसाठी तयार करण्यात येईल व तीन वर्षांच्या निरीक्षण व मार्गदर्शनानंतर शेवटच्या वर्षात प्रत्येक शाळेतून निवडलेल्या दोन किंवा तीन विद्यार्थ्यांचे एखादे खास शिबिर महाविद्यालयांत घेऊन त्यांच्याकडून काही प्रयोग व काही छोटे प्रकल्प करून घेता येतील व त्यांना व्याख्यानांद्वारे शास्त्रविषयक खास ज्ञान देता येईल. समूहाने अशा तऱ्हेने सातत्याने व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यास खात्रीने बरेच विद्यार्थी विज्ञान नैपुण्य शोध परीक्षेत चांगले यश मिळवू शकतील.

### फिरती प्रयोगशाळा अथवा प्रयोग केंद्रे

समूहामार्फत फिरत्या प्रयोगशाळांचाही कार्यक्रम आखता येईल. अनेक छोट्या ग्रामीण शाळांत पुरेशी उपकरणे नसल्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रयोग करता येत नाहीत अगर दाखविता येत नाहीत. अशा शाळेत जरूर ती उपकरणे व साधने घेऊन महाविद्यालयांतील प्रयोगदर्शक असे मोठ्या शाळांतील अनुभवी शास्त्रशिक्षक जाऊन त्यांनी विद्यार्थ्यांकडून हे प्रयोग करून घेतले. अगर या शाळांतील विद्यार्थ्यांना जवळच्या मोठ्या शाळेत नेऊन येथील प्रयोगशाळेत त्यांना प्रयोग करू दिले तर सर्व परिसराचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होईल.

अंबाजोगाई महाविद्यालय शाळा समूहातर्फे १९६८ व १९७० च्या महिन्यात यासाठी 'प्रयोग दिन' आयोजित करण्यात आले होते. या दिवशी समूहांतर्गत ज्या शाळांत उपकरणे, प्रयोगशाळा अगर प्रशिक्षित शिक्षक यांच्या उणिवांमुळे विद्यार्थ्यांना प्रयोग करावयास देता येत नसत अशा शाळांतील ९वी व १० वी च्या विद्यार्थ्यांकडून महाविद्यालय व शहरांतील मोठ्या शाळांच्या प्रयोगशाळांत प्रत्येकी चार-चार निवडक प्रयोग करून घेतले गेले. त्यासाठी महाविद्यालयाने गरजू शाळांना प्रयोगांसाठी उपकरणे व शिक्षक पुरवले. एखाद्यावेळी जवळजवळ १०००-१५०० विद्यार्थ्यांनी निरनिराळ्या केंद्रात चार प्रात्यक्षिके केली. ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या ज्ञान प्रत्ययाचा व कार्यानुभवाचा आनंद खरोखरच अवर्णनीय होता.

या वर्षी अंबाजोगाई समूहाने हा प्रयोग वर्षभर रविवारी व सुट्टीच्या दिवसांत कार्यान्वित करावयाचे ठरविले असून समूहांतर्गत शाळांतील ९ वी, १० वी व ११ वी च्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून कमीतकमी दहा प्रयोग करून घ्यावयाचे योजिले आहे. त्यासाठी महाविद्यालयातील प्रयोग शाळा वर्षभर रविवार व सुट्टीच्या दिवसांत उघड्या राहतील.

### विद्यार्थ्यांचा सहभाग

या योजनेत महाविद्यालयातील द्वितीय व तृतीय वर्ष पदवी वर्गातील विद्यार्थ्यांना देखील सहभागी करून घेता येईल.

---

मनाचे दरवाजे नेहमी खुले ठेवा, ज्ञानाचा प्रकाश कुठून कधी येईल सांगता येत नाही!

या वर्षातील हुशार व उत्सुक विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित व विज्ञान यांच्या अध्यापनाचे थोडे प्रशिक्षण देऊन, त्यांना ग्रामीण शाळांतून सुटीच्या दिवसांत हे विषय शिकविता येतील. तसेच महाविद्यालयातील प्रयोग केंद्रात प्रयोग-शिक्षक म्हणून काम करता येईल.

नुकत्याच सुरू झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेत (National Service Scheme) या उपक्रमास स्थान देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मराठवाडा विद्यापीठाने आपल्या बहिःशाला अभ्यास मंडळाच्या कार्यक्रमांतही या योजनेचा पुरस्कार केला आहे. त्यांच्याशी समन्वय साधून महाविद्यालय शाळा समूहास ही योजना कार्यान्वित करता येईल.

**योजनेची व्याप्ती**

अशातऱ्हेने समूहांतर्गत विद्यालयांमध्ये व त्यातील शिक्षकामध्ये परस्पर सहकाराची भावना व भ्रातृभाव दृढ करण्याचा व या भागांवरील अत्यंत मागास शाळेतील विद्यार्थ्यांनादेखील उत्कृष्ट अध्यापन व शिक्षणसाधने उपलब्ध व्हावीत या जिद्दीने समूहाने प्रयत्न केल्यास महाविद्यालया भोवतालच्या ग्रामीण परिसरात शैक्षणिक विकास घडून आल्याशिवाय रहाणार नाही. सुदैवाने महाराष्ट्रातील ग्रामीण भागात सध्या बरीच महाविद्यालये स्थापन झाली आहेत. या प्रत्येक महाविद्यालयाने आपल्या भोवतालच्या दहा मैलांच्या परिसरातील शाळा घेऊन एक महाविद्यालय शाळा समूह स्थापून कार्यान्वित केला तर महाराष्ट्र राज्यात एक शैक्षणिक क्रांती झाल्याशिवाय रहाणार नाही.

महाविद्यालय शाळा समूह योजनेची सुप्तशक्ती (Petentiality) अमाप आहे. मात्र जिद्दीने, तळमळीने ती कार्यान्वित केली गेली पाहिजे. याबाबत ग्रामीण भागांतील महाविद्यालयांनी व विशेषतः त्यांच्या प्राचार्यांनी पुढाकार घेतला पाहिजे व नेतृत्व दिले पाहिजे. सहकाऱ्यांचे सहकार्य आपोआप होते असा अनुभव आहे.

**शासनाचे सहकार्य**

तथापि खाजगी महाविद्यालयांचे प्राचार्य अगर शिक्षकवर्ग यांची जिद्द व तळमळ कितीही असली तरी प्रत्यक्ष कार्याच्या यशस्वितेच्या दृष्टिने त्याला मर्यादा आहेत. ही योजना जर उत्तमप्रकारे कार्यान्वित व्हावयाची असेल तर, तिची पद्धतशीर कार्यवाही व अनुशासन व्हावयाचे असेल तर प्राध्यापकांच्या व शिक्षकांच्या तळमळीला शासनाच्या सक्रिय सहकार्याची जोड असणे अगत्याचे आहे. या कामांत या दोहोंचाही समन्वय हवा. या दृष्टीने काही सूचना करण्यासारख्या आहेत.

ज्यांच्यासाठी प्रामुख्याने ही योजना राबवायची हे ग्रामीण मागास शाळांतील शिक्षक हे महाविद्यालयाच्या शहरी होणाऱ्या चर्चामंडळांच्या व इतर कार्यक्रमांना फार थोड्या संख्येने हजर असतात. त्यांची प्रमुख अडचण त्यानिमित्ताने होणाऱ्या प्रवास व इतर खर्चाची आहे. प्रत्येक वेळी शिक्षकाला हा खर्च स्वतः करणे परवडण्यासारखे नसते व शाळांना हा सर्व खर्च अनुदानपात्र असल्याशिवाय करणे कठीण जाते. यासाठी शाळा समूहाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने होणारा शिक्षकांचा प्रवास खर्च व पाहुण्या प्राध्यापकांचा अगर प्रशिक्षित शिक्षकांचा प्रवास व इतर खर्च अनुदानपात्र ठरवावा अगर त्यासाठी शाळा समूहाला जरूर ते अनुदान मंजूर करावे.

अनेकवेळा असेही अनुभवास आले आहे की, ग्रामीण भागात शाळेतील शिक्षक या कार्यक्रमाविषयी उदासीन असतात व समूहातर्फे केलेल्या आवाहनाला व पाठविलेल्या पत्रकांना पुरेसा प्रतिसाद मिळत नाही. यासाठी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांशी संपर्क साधून त्यांचेमार्फत मुख्याध्यापकांना सूचना देणे आवश्यक होते.

त्याचप्रमाणे या योजनेच्या अनुशासनाच्या दृष्टीने

समूहांतर्गत शाळांतून विज्ञान मंडळे व समूहाच्या इतर कार्यक्रमाचे कार्य कसे चालेल याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन करणे जरूर आहे. यासाठी या शाळांना मधूनमधून प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्या अडचणी समजावून घेण्यासाठी शासनाने समूहाला वाहन खर्चासाठी काही अनुदान द्यावे अगर गट विकास अधिकाऱ्यांचे वाहन उपलब्ध करून द्यावे. त्याप्रमाणे जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनी समूह संचालकांशी संपर्क ठेवून निरनिराळ्या कार्यक्रमांची माहिती करून घ्यावी. त्यावेळी प्रत्यक्ष हजर राहून त्यात भाग घेऊन मार्गदर्शन करावे व प्रशिक्षण शिबिरे, परिसंवाद, चर्चासत्रे वगैरे कार्यक्रम समूहाच्या विचार-विनिमयाने सहकार्याने आखावेत. शासनाचे असे सहकार्य असल्याशिवाय या योजनेची वाटचाल होणे कठीण आहे. ग्रामीण महाविद्यालये आपल्या तुटपुंज्या द्रव्यबळावर ही योजना जरूर त्या जोमाने कार्यान्वित करू शकणार नाहीत.


महाविद्यालय शाळा समूह योजनेची उपयुक्तता ध्यानात घेऊन गेली २ वर्षे ही योजना प्रत्यक्ष कार्यान्वित करताना सुचलेले कार्यक्रम व मनांत आलेले विचार मुद्दाम येथे विस्ताराने मांडले आहेत. उद्देश असा की, त्या निमित्ताने त्यावर विचार होऊन महाराष्ट्रात या चळवळीने वेगाने मूळ धरावे.

**– प्राचार्य म. द. नाडकर्णी**
योगेश्वरी महाविद्यालय,
अंबाजोगाई

•••

→

**प्राचार्य म. द. नाडकर्णी यांच्या हस्ताक्षरातील सर्व्हिस रेकॉर्ड**



Service Record as College Teacher
1947 - 80

MADHUSUDAN DATTATRAYA NADKARNI.

4th July 1947 – Joined as Professor of Chemistry, in M.J. College, Jalgaon on Rs. 150 p.m. in the scale of Rs. 150-10-350.
1st Nov. 1952 – Appointed Head of the Chemistry Dept.
1956 – Pay scale revised to Rs. 250-400.
1960 – " Rs. 300-25-600
1966 – " Rs. 400-800.
31st May 1968 – Resigned from M.J. College
1st June 1968 – Joined as Principal Yogeshwari Mahavidyalaya Ambajogai on Rs. 900 in the scale of Rs 700-1100.
31st May 1971 – Relinquished the post at Yogeshwari Mahavidyalaya
1st June 1971 – Joined as Principal, Arts, Science & Commerce College, Thane on Rs. 1020 p.m. in the scale R 700-60-900-50-1100.
1st Jan 1973 – Revised and placed at Rs. 1500 p.m. in the scale of Rs 1500 – 2500.
15th June 1975 – Transferred as Principal B. N. Bandodkar College of Science, Thane, subsequent to bifurcation of the composite College.
19th Nov. 1980 – Retired from Service on Superannuation.

MDNadkarni
22.11.82

# आठवणींचे चांदणे

''जीवन त्यांना कळले हो
'मी'पण त्यांचे पक्व फळापरी सहजपणे गळले हो'' .

प्रिय दादा,

ह्या काव्यपंक्ती म्हणजे तुमचे मूर्तिमंत उदाहरण आहे. तिन्हीसांज झालेली असते. देवापुढे सांजवात तेवत असते. देवघरातील उदबत्तीचा दरवळ मन शांत-निवांत करत असतो. आभाळात चांदण्या उगवायला लागलेल्या असतात आणि माझ्या मनाचे झाड तुमच्या आठवणींच्या चांदण्यांनी लगडून जाते.

तुम्ही माझे जन्मदाते होतातच, पण 'संस्कार गुरू' पण होतात. तुमचे अध्यापन क्षेत्र, विद्यार्थ्यांविषयी वाटणारी कळकळ, आपुलकी, स्वतःच्या विषयाला वाहिलेली समर्पणशीलता बघत बघत मी मोठी होत होती. तुमच्यासारखे अध्यापक क्षेत्रात स्वतःला वाहून घ्यावे असे 'बीज' मनात रुजले.

तुमचा स्वभाव ऋजू व समंजस असल्यामुळे आम्हा तिघा भावंडांवर 'अमुक एका शाखेतच जा' अशी सक्ती झाली नाही. दोन्ही भाऊ विज्ञानक्षेत्रात तर मी 'कला' शाखेत प्रवेश घेतला.

वाचनाची आवड तुमच्यामुळे आमच्या तिघांच्या मनात निर्माण झाली. कामानिमित्त मुंबई-पुण्याला गेलात तर भरपूर पुस्तके घेऊन येत असत. जळगावला आमच्या गल्लीत छोटं वाचनालय सुरू केले. आमचा मित्रपरिवार पुस्तके वाचायला घेऊन जात असे. 'मंगल-विकास बालवाचनालय' असा स्टॅम्प प्रत्येक पुस्तक रुबाबात मिरवत असे.

वाचनाचा हव्यास महाविद्यालयात गेले आणि अधिकच वाढला. जोडीला नाटक, वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रिका लिखाण, मराठी वाङ्मय मंडळ ह्या क्षेत्रात मनमुराद धुमाकुळ सुरू होता. इतर आयांप्रमाणे माझ्या आईला माझ्या अभ्यासाची काळजी वाटत होती. घरात मी कुठल्याच कामाला हात लावत नसे. तिने याबाबतीत तुमच्याकडे तक्रार केली होती. तेव्हा तुम्ही तिला सांगितले, ''पुढील काळजी करू नको. तिला ज्या ज्या अवांतर गोष्टीत भाग घ्यायचा आहे त्यात घेऊ दे.'' परीक्षा जवळ आल्यावर मला शांत स्वरात सांगत असत, ''थोडे दिवस अवांतर हालचाली बंद ठेव. अभ्यासाकडे लक्ष दे.'' तुमच्या शांत स्वभावाचा मनावर परिणाम होत असे आणि अस्मादिक अभ्यासाला सुरुवात करत असे.

तुम्ही आम्हाला 'माणूसपण' जपायला शिकवले. नाती जपायला शिकवली. मैत्रीचे मोल पटवून दिले. एखादी व्यक्ती आपल्याबरोबर विचित्र वागली तरी लगेच तिच्यावर X मारू नये, तिचे चांगले गुण आठवून तिला माफ करावे. थोडक्यात; तिच्या गुणदोषासकट तिचा स्वीकार करावा. माझ्या दृष्टीने सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी विद्यार्थ्यांवर अपत्यावत माया केली. विद्यार्थी त्यांच्याजवळ आपले मन मोकळे करत असत (प्रेम प्रकरणेसुद्धा). ते त्यांची समजूत घालत. त्यामुळेच माझ्या आंतरजातीय विवाहाला तुम्ही अजिबात विरोध केला नाही.

दादा, तुम्हाला गाण्याची जबरदस्त आवड होती. रेडिओवरील 'मंगल प्रभात' पासून तुमच्या दिवसाची सुरुवात होत असे. 'गगनी उगवला सायंतारा' किंवा 'मधुमागशी माझ्या सख्या परी' ही गाणी तुम्ही तुमच्या सुरेल स्वरात गुणगुणत असत. ते स्वर अजूनही माझ्या

कानात रुणझुणत आहेत. तुमचा 'आदर्शवाद' हे तुमचे मोठे बळ होते. त्या संदर्भात दोन प्रसंग मला आठवत आहेत.

तुमच्या महाविद्यालयात मराठी विभागात अध्यापकाची जागा होती. पण, 'ज्या महाविद्यालयाचा मी प्राचार्य आहे तेथे माझ्या मुलीची निवड झाली तरी मी तुला घेणार नाही' असे तुम्ही निक्षून सांगितले. या संदर्भात आईचा आणि माझा तुमच्याबरोबर वाददेखील झाला होता.

एका वर्षी वेतनवाढीसाठी प्राध्यापकांचा संप सुरू होता. कॉलेजच्या 'संप युनियन'मध्ये मी एक सभासद होते. त्याकाळात तुमची आणि माझी गरमागरम चर्चा होत असे. आपण शिक्षक म्हणजे 'कामगार युनियन' नाही असे तुम्ही म्हणत असत. त्या काळात तुम्ही व्यथित झाला होतात.

शिक्षकाने इमानेइतबारे विद्यादान केले पाहिजे. त्याने शिकवण्या घेऊ नयेत. पवित्र विद्यादानाचा अपमान करू नये. तुम्ही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असत. पण एकही पैसा त्यांच्याकडून घेतला नाही.

आदर्शवाद एकप्रकारे 'असिधाराव्रत' होते. ते तुम्ही प्राणपणाने जपले. आईने देखील तुम्हाला यथायोग्य साथ दिली. सगळ्या नातेवाईकांच्या गोतावळ्यात तुम्हाला 'देवमाणूस' म्हणून संबोधले जायचे. तुमच्या छत्रछायेखाली वाढलेल्या आम्ही चांगला 'माणूस' बनण्याचा प्रयत्न केला.

**– प्रा. मंगला नांदुर्डीकर (नाडकर्णी)**

●●●




हिंदी दिवस. प्रमुख पाहुणे प्रो. रामनाथ पाण्डेय (१९७४)

---

सोन्याची किंमत होईल पण शिक्षण हे अमूल्य आहे.

# आठवणींचे मोहोळ

दादा नाडकर्णींच्या सांगण्यासारख्या आठवणी अनेक. किती सांगाव्यात ?

जळगावसारख्या त्या वेळच्या छोट्या गावांत एकमेव कॉलेजात दादा प्राध्यापक असल्याने सगळेच त्यांना 'एक आदर्श शिक्षक' म्हणून ओळखायचे. विद्यार्थ्यांना भीतीयुक्त आदर असायचा. आमचे तर सगळ्या कुटुंबातील संबंध जोडलेले होते. अनेक वर्षांनी ते माझे सासरे झाले तरी माझ्या मनांत त्यांची प्रतिमा विद्यार्थ्यांविषयी तळमळ असणारा उत्तम शिकविणारा आणि आदर्श पाळणारा/पाळून देणारा शिक्षक हीच आहे.

म्हणूनच त्यावेळी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला असणाऱ्या मला आणि इतर दोघांना बोलवून I.I.T. च्या Entrance ला बसा या विषयी माहिती देण्याचा खटाटोप त्यांनी केला. त्यावेळी जळगांव सारख्या ठिकाणी I.I.T. Entrance विषयी आणि त्यातल्या स्पर्धेविषयी आम्ही सगळेच अनभिज्ञ म्हणून दादांनी पुढाकार घेऊन आम्हां तिघांसाठी Phycies, Chemistry आणि Mathematics साठी कॉलेजातल्या प्राध्यापकांना सांगून त्यांच्या प्रत्येकाच्या घरी आमच्यासाठी स्पेशल कोचिंगची व्यवस्था केली. ते स्वतः केमिस्ट्रीचे कोचिंग करत. एकाही प्राध्यापकाने एक पैसादेखील फी म्हणून घेतला नाही. तिघांमधून आम्ही दोघे निवडले गेलो हीच त्यांची बिदागी होती.

पुढे नंतर नोकरीला लागल्यावर ठाण्यांत रहायचे म्हणजे त्यावेळी दादा माझे सासरे झाले होते. त्यांच्याच ओळखीतून ठाण्यात घर, मुलींना शाळेत प्रवेश वगैरे अनेक अवघड वाटण्याच्या गोष्टी सुद्धा झाल्या. पदोपदी ठाण्यातल्या सामाजिक जीवनांत त्यांना किती मान आहे हे जाणवत गेले.

योगायोग असा की, ज्या दिवशी ते हॉस्पिटमध्ये अचानक हार्ट अॅटॅकनीं गेले त्यादिवशी जाण्याआधी काही तास आधीच त्यांना भेटणारे आम्हीच दोघे I.I.T. ला निवडून आलेले त्यांचे विद्यार्थी होतो !

त्यांच्यासारख्या आदर्श शिक्षकांच्या संपर्कात आल्यामुळे माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्याचे कल्याण झाले.

**– शरद नांदुर्डीकर**

•••




साहित्य सहकार (१९७४)




स्टुडण्ट कौन्सिलच्या उद्‌घाटन प्रसंगी
भाषण करताना कुलगुरू प्राचार्य राम जोशी




डिप्लोमा इन बिजिनेस मॅनेजमेंटच्या समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे
राम प्रधान यांचे स्वागत करताना (१९७४-७५)



महाविद्यालयाचा स्नातकेच्छ विद्यार्थ्यांच्या
पहिल्या तुकडीस हार्दिक शुभेच्छा देताना!



''अंतराळाचा शोध'' या विषयावर भाषण करताना
प्रो. भालबा केळकर



बापू नाडकर्णी यांच्या समवेत (१९७५-७६)



ठाणे नगरपालिकेचे नगराध्यक्ष सतीश प्रधान यांचे स्वागत
करताना डॉ. वा. ना. बेडेकर (१९७५)



संचालक समिती विद्या प्रसारक मंडळ व प्रमुख पाहुणे
एस. एम. जोशी (१९७२-७३)



कार्यकारिणी समिती



बॅडमिंटन चेस आंतर महाविद्यालयीन विजेते
व उपविजेते (१९७५-७६)



बॅडमिंटन संघ झोन-V (१९७५)



श्री. चंदनगडकर यांची महाविद्यालयातील क्रिकेट मैदानाचे
उद्घाटन भेट १९/१०/१९७४



बास्केट बॉल आंतर महाविद्यालयीन झोन-V
उपविजेते (१९७५-७६)



कब्बडी संघ (१९७५-७६)



कब्बडी संघ झोन-V (१९७५)



हॉकी संघ झोन-V उपविजेते (१९७५)



जिमखाना कमिटी (१९७६-७७)



विज्ञान प्रदर्शन उद्घाटन (१९७१-७२)



डॉ. वा. ना. बेडेकर व प्रा. नाडकर्णी
यांची विज्ञान प्रदर्शन भेट (१९७५-७६)



डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या समवेत प्रदर्शनाला भेट




विज्ञान वाणिज्य कला प्रदर्शनात प्रात्याक्षिकाचे
निरिक्षण करताना



नाडकर्णी सर व प्रमुख पाहुणे एस. के. थेरानी
कला प्रदर्शन पाहताना (१९७४-७५)



डॉ. वा. ना. बेडेकर प्रदर्शनाची पाहणी करताना (१९७५)



N.S.S. Fun Fair मध्ये सहभागी झालेल्यांबरोबर
संभाषण करताना (१९७५-७६)



विज्ञान, वाणिज्य, कला प्रदर्शन (१९७२-७३)



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे
प्रा. ए. एन्. कोठारे (१९७६-७७)



विद्यार्थी संसद (१९७६-७७)



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे
प्रा. ए. एन्. कोठारे (१९७७-७८)



विद्यार्थी संसद (१९७७-७८)



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे
प्रा. भालबा केळकर (१९७८-७९)



विद्यार्थी संसद (१९७८-७९)



वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी प्रमुख पाहुणे
प्रा. जयंत पाटील (१९७९-८०)



विद्यार्थी संसद (१९७९-८०)

# शिक्षणमहर्षी प्राचार्य म. द. नाडकर्णी

जून १९६९ मध्ये विद्या प्रसारक मंडळाने के. जी. जोशी कला, ना. गो. बेडेकर वाणिज्य आणि बा. ना. बांदोडकर विज्ञान असे संयुक्त महाविद्यालय सुरू केले. सुरुवातीला २ वर्षे संस्कृत विषयाचे प्रा. के. जी. बेडेकर प्राचार्य होते. जून १९७१ मध्ये राष्ट्र सेवा दलाच्या तालमीत तयार झालेले, खादीचे कपडे वापरणारे एक ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व म. द. नाडकर्णी प्राचार्य म्हणून रुजू झाले. त्यांची निवड रँगलर डॉ. वा. खु. चौधरी यांनी केली होती. डॉ. चौधरी महाराष्ट्र शासनाचे डायरेक्टर ऑफ हाय्यर एज्युकेशन होते.

प्राचार्य नाडकर्णी पूर्वी आंबेजोगाईच्या महाविद्यालयामध्ये प्राचार्य होते. त्या अगोदर पुष्कळ वर्षे ते जळगावच्या एम. जे. महाविद्यालयामध्ये रसायनशास्त्र शिकवित होते.

प्राचार्य नाडकर्णी ठाण्याला आले तेव्हा त्यांचा छोटा मुलगा आनंद (आताचे सुप्रसिद्ध मनोविकार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी) इ. ९ वी किंवा १० वी मध्ये होता. विद्यार्थी विरुद्ध प्राध्यापक असा क्रिकेटचा सामना दादोजी कोंडदेव मैदानावर (त्यावेळी स्टेडिअम झालेले नव्हते) झाला होता. ह्या सामन्याचे समालोचन आनंदने केलेले मला आठवते आहे.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याला उत्तम नागरिक बनवण्यासाठी नाडकर्णी सरांनी वेगवेगळे उपक्रम राबविले. स्टुडंट कौन्सिलच्या उद्घाटनासाठी त्यांनी प्रा. ग. प्र. प्रधान, प्रा. एन्. कोठारे तसेच कुलगुरू प्रा. राम जोशी यांना पाचारण केल्याचे माझ्या स्मरणात आहे. त्यांच्या मार्गदर्शनाचा विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना चांगला लाभ झाला. एस. एम. जोशी यांनीही महाविद्यालयाला भेट दिल्याचे आठवते. क्रिकेट टीमला मार्गदर्शन करण्यासाठी सुप्रसिद्ध क्रिकेटपटू माधव मंत्री सुद्धा आले होते.

१९७५ च्या दरम्यान डिप्लोमा इन बिझनेस मॅनेजमेंट (D.B.M.) सुरू करण्यात आले. त्याची सर्व जबाबदारी उपप्राचार्य श्री. दा. मुळगावकर यांच्यावर सोपवण्यात आली. त्याचे आता मोठ्या डॉ. वा. ना. बेडेकर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटमध्ये रूपांतर झाले आहे.

१९७५ मध्ये बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, कला व वाणिज्य महाविद्यालयापासून वेगळे करण्यात आले. हा नाडकर्णी सरांना मोठा धक्का होता. आता ते छोट्या बांदोडकर महाविद्यालयाचेच प्राचार्य राहिले होते.

बांदोडकर सायन्स महाविद्यालय, जोशी-बेडेकर कला व वाणिज्य महाविद्यालया पासून वेगळे झाल्यामुळे सुरुवातीच्या काही काळासाठी, बांदोडकर महाविद्यालयातील प्राचार्य, ग्रंथपाल आणि कार्यालयीन प्रमुख ही तीन पदे नवीन निर्माण झाल्यामुळे विनाअनुदानीत झाली होती. हा तोटा असला तरी स्वतंत्र महाविद्यालयाचा विकास होण्यासाठी खूप फायदेशीर ठरले.

१९७६ पासून 'संयुजा' नावाचे महाविद्यालयाचे वार्षिक सुरू करण्यात आले. हा उपक्रम खूपच स्तुत्य असा होता.

राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) च्या १० दिवसाच्या निवासी शिबिरामध्ये नाडकर्णीसर २-३ दिवस जीतीने हजर असायचे!

ठाणे व आजूबाजूच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षकांसाठी ''स्कूल-कॉलेज कॉम्प्लेक्स'' हा महत्त्वाचा उपक्रम त्यांनी सुरू केला. त्याचा चांगला फायदा गणित आणि सायन्स विषयांच्या शिक्षकांना झाला.

१०+२+३ हा आकृतीबंध येण्यापूर्वी बांदोडकर

महाविद्यालयामध्ये केमिस्ट्री, मॅथेमॅटिक्स आणि झूऑलॉजी हे विषय शेवटच्या वर्षी पदवीसाठी शिकवले जायचे. नवीन आकृतीबंध आल्यानंतर फिजिक्स, बॉटनी आणि स्टॅटिस्टिक्स हे विषयसुद्धा टी. वाय. बी.एस.सी.साठी सुरू करावेत असा आग्रह आम्ही विभागप्रमुखांनी धरला. प्राचार्य नाडकर्णी सरांचे असे म्हणणे होते की, 'ह्या विषयांना पुरेसे विद्यार्थी मिळणार नाहीत.' हे आम्हा विभागप्रमुखांना खटकले. आम्ही आमच्या मागणीसाठी डॉ. वा. ना. बेडेकर, गुणाकर जोशी, तसेच तत्कालीन कार्याध्यक्ष रा. कृ. गोखले यांना भेटलो. गोखले साहेबांनी आमची मागणी मान्य केली आणि टी. वाय. बी. एस्सीला सर्व सहा विषय शिकवण्यात येऊ लागले.

टी.वाय. बीएस्सीला फिजिक्स सुरू झाल्यामुळे पहिल्या बॅचचा विद्यार्थी व्यंकटरमण महाविद्यालयाचा प्राचार्य झाला!

पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाली त्यावेळी महाविद्यालय बंद पाडण्यासाठी कांती कोळी आणि इ. काँग्रेस कार्यकर्ते आले होते. त्यावेळी प्राचार्य नाडकर्णीसरांनी खंबीरपणे प्रवेशद्वाराशी उभे राहून त्यांना परतवून लावल्याचे मला आठवते.

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांबरोबरच सरांनी आपल्या स्वतःच्या मुलांना उत्तम शिक्षण दिले व चांगले संस्कारही केले. त्यांची मुलगी नांदुर्डीकर प्राध्यापिका झाली. डॉ. विकास N.C.L. मध्ये शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत होता. छोटा डॉ. आनंद हा सुप्रसिद्ध मनोविकार तज्ज्ञ म्हणून कार्यरत आहे आणि I.P.H. च्या माध्यमातून मोठे सामाजिक कार्यही करत आहे.

नाडकर्णी सरांच्या मार्गदर्शनाचा मिळालेला लाभ, तसेच गेले ५० वर्षे बांदोडकर महाविद्यालयाशी निगडित असल्याबद्दलचा मला रास्त अभिमान आहे.

प्राचार्य नाडकर्णी यांनी महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी घेतलेले परिश्रम आणि रचलेल्या पायावर बांदोडकर माहविद्यालय भक्कमपणे उभे आहे. नाडकर्णी सरांची विद्यार्थिनी प्राचार्य डॉ. माधुरी पेजावर यांनी आपल्या सहकारी प्राध्यापक आणि शिक्षकेतरांच्या सहकार्याच्या मदतीने २०१० साली मुंबई विद्यापीठातील सर्वोत्तम महाविद्यालयाचा बहुमान मिळवला आहे. प्राचार्य नाडकर्णी सरांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये त्यांचे स्मरण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली!

**– प्रा. सी. जी. पाटील**
निवृत्त प्राचार्य, बांदोडकर महाविद्यालय



अध्यापक वर्ग १९७१-७२

# म. द. नाडकर्णी : आठवणींचे सुगंधी थेंब

अत्तराची कुपी उघडली की सुगंध आसपास सर्वत्र दरवळतो. कुपीच्या आतील द्रव्याच्या पृष्ठभागाची जर ही जादूई किमया असेल तर त्या द्रव्याच्या प्रत्येक थेंबामध्ये केवढा तरी सुगंध दाटलेला असणार! नाडकर्णी सरांच्या सुगंधी आठवणीची अत्तर कुपी मला उघडण्याचा योग आला, जेंव्हा जानेवारीच्या मध्यावर श्रीमती माधुरी पेजावर यांचा मला दूरध्वनी आला. प्रसन्न सकाळ होती. नेहमीचे औपचारिक बोलणे झाल्यावर त्यांनी मला विद्या प्रसारक मंडळाने स्व. प्राचार्य म. द. नाडकर्णी जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या संदर्भात 'दिशा'चा विशेष अंक काढण्याची संकल्पना सांगितली आणि ठाणेकरांपेक्षा अंबेजोगाईकर म्हणून तुमचा सरांबरोबर जास्त सहवास असल्याचे सांगून त्यावर आधारित लेख लिहिण्याची विनंती वजा आग्रह धरला. त्यांच्याशी सुरुवातीच्या औपचारिक गप्पानंतर मुख्य विषयांच्या चर्चेत मी प्रेषक होतो आणि त्या वक्त्या. माझे निःशब्द अश्रूंच्या माध्यमातून माझ्याशीच बोलत होते. एका ग्रीक विचारवंताने म्हटले आहे की, व्यक्तीचा भावनिक भाग हा त्या व्यक्तीचे जवळचे लोक आणि त्यांच्या निःस्वार्थी प्रेमावर अवलंबून असतो. आईच्या आठवणींनी भा. रा. तांबें सारख्या श्रेष्ठ कवीचा जीव व्याकूळ होऊन जातो हा त्याचाच पुरावा. जेवढी व्यक्ती जवळची तेवढा भावनिक भाग जास्त. या क्षेत्रामधील संशोधन पुढे असे सांगते की, तुमच्या एकांतवासात अशा जवळच्या आठवणींमुळे भावनिक भाग वेगाने वाढत असतो. मॅडमचा दूरध्वनी आणि सरांची मला व्याकुळतेने झालेली आठवण आणि त्यावेळी घरामध्ये असलेले माझे एकटेपण सर्वच एकत्रित दाटून आले. लेख देण्याची कालमर्यादा संपली तरी माझ्यामधील सरांबद्दलचा भावनिक भाग मला लिखाण करू देत नव्हता. मात्र निर्धार करून पेन हातात घेतलेच. सरांचीच शिकवण होती;- नात्यांचा गुंता सोडवताना जो शब्दांना अबोल करतो तो निश्चितच कर्तृत्वाने मोठा होत असतो!

आपण ज्या शाळेत अथवा महाविद्यालयात शिक्षण घेतले, जेथे आपण घडले जातो तेथेच पुन्हा अध्यापनाची संधी मिळणे हा दुग्धशर्करा योग. या योगास पात्र झालेला मी एक. अंबेजोगाईच्या योगेश्वरी महाविद्यालयात १९६८ ला बी.एस्सी उत्तीर्ण झाल्यावर नंतर एम.एस्सी वनस्पतीशास्त्र पूर्ण करून पुन्हा माझ्याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून येण्याची संधी मिळणे म्हणजे अहम भाग्यच! हे भाग्य मला नाडकर्णी सरांच्यामुळे मिळाले. सर १९६९ ते ७१ या दोन वर्षांच्या कालखंडामध्ये ते तेथे प्राचार्य होते. सरांचा मला विद्यार्थी होण्याचे भाग्य लाभले नाही, पण त्यांचा एक वर्षाचा सहकारी म्हणून त्यांनी मला विद्यार्थ्यापेक्षाही कितीतरी वेगळ्या पद्धतीने घडविले होते याची मला माझ्या यशस्वी जीवनात पदोपदी आठवण होते. अंबेजोगाईच्या विज्ञान महाविद्यालयाचे सरांनी सरस्वती मंदिरच केले होते, जेथे फक्त विज्ञानाच्या माध्यमातून विद्येचीच पूजा होत असे. याच विद्येच्या प्रांगणामध्ये सरांनी गरीब विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतीगृह, सर्वपल्ली राधाकृष्णन ग्रंथालयाची सुसज्ज स्वतंत्र इमारत आणि प्राचार्यांसाठी स्वतंत्र निवासस्थान यांची निर्मिती केली. प्राचार्याला त्याचे कर्तव्य पूर्ण करण्यासाठी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्येच त्याचे निवासस्थान असावे हे विद्यापीठ अनुदान आयोगाचे आग्रही मत सरांनी पूर्ण केले. मराठवाड्यामधील त्यावेळचे ते एकमेव महाविद्यालय होते जेथे प्राचार्य महाविद्यालयाच्या संकुलात राहात होते. याच महाविद्यालयात प्राध्यापक असताना मी

तेथील विद्यार्थी वसतीगृहाच्या भोजनालयात जेवण घेत असे. सरांना याचे फार कौतुक होते. महाविद्यालयाच्या वसतीगृहाची पहाणी करणे, विद्यार्थ्यांच्या खोल्यांवर जाणे, त्यांच्या जेवणाची, अभ्यासाची, आर्थिक अडचणीची माहिती घेऊन त्यावर त्वरीत कार्यवाही करणे हा सरांचा प्रत्येक दिवशी रात्रीचे जेवण झाल्यानंतरचा आगळा-वेगळा फेरफटका असे. त्यांच्या या दैनंदिन उपक्रमात अनेकवेळा मी सहभागी झालो होतो. कितीतरी गरिब विद्यार्थ्यांवर त्यांनी मायेची झालर पसरलेली होती. त्यांच्या त्या उबीमुळे अनेक विद्यार्थी शिक्षण पूर्ण करून उच्च पदावर गेले. माझ्या सारखा एखादा अपवाद सोडला तर सरांचे हे कार्य फार कमी लोकांना माहीत होते. विशेष म्हणजे सरांनाच ते इतरांना सांगणे आवडत नसे. अंबेजोगाई विज्ञान महाविद्यालयाचे गरीब विद्यार्थ्यांचे वसतीगृह हे याचसाठी जास्त संवेदनशील होते. सर म्हणत, ‘हे माझे मोठे घर आहे, ही सर्व माझी मुले आहेत.’ साने गुरुजींचे साहित्य, संस्कार सर्वानाच माहीत आहेत; पण त्यांना प्रत्यक्ष आचरणात आणणारी ही व्यक्ती म्हणजे नाडकर्णी सर. शिस्तप्रिय असूनही विद्यार्थ्यांत आणि प्राध्यापकांत अफाट लोकप्रिय असलेले सर त्या महाविद्यालयाला १९६९ ते ७१ मध्ये खऱ्या अर्थाने सुवर्णकाळ देऊन गेले. रसायन शास्त्रासारख्या विषयाला अतिशय सोपे करून शिकवण्याची त्यांची पद्धती आणि त्यामुळेच अनेक वेळा कला शाखेच्या विद्यार्थ्यांना सुद्धा त्यांच्या वर्गात बसून आनंद लुटताना मी पाहिले होते. विद्यार्थ्यासारखाच दिसणारा मी शंभर मुलांच्या वर्गावर शिकवताना सर काळजीपोटी वर्गाबाहेर होते याची मला कल्पना सुद्धा नव्हती; पण त्यानंतरची त्यांची कौतुकाची थाप मला माझी ३३ वर्षांची शैक्षणिक कारकीर्द यशस्वीपणे पूर्ण करण्यास कायम प्रोत्साहित ठरली. शिक्षकाने वर्गावर जाताना नेहमी पूर्ण अभ्यास करून जावे, हातात चिठ्ठी कधीही नेऊ नये ही सरांची शिकवण मी माझ्या शैक्षणिक कारकिर्दीत तंतोतंत पाळली. सरांनी त्यांच्या निवासस्थानासमोर वनस्पतीशास्त्राचे सुंदर उद्यान तयार करून घेतले होते. वनस्पती शास्त्राच्या विद्यार्थ्यांनी नियमितपणे या उद्यानाला भेट देऊन टिपणे काढावी यासाठी ते कायम आग्रही असत. सरांच्या निवासस्थानाच्या पायऱ्या श्रद्धेने चढण्याचा मला अनेक वेळा योग आला. सरांचा मुलगा आनंद तेव्हा शाळकरी विद्यार्थी होता. शिपाई जेव्हा त्याला शाळेत घेऊन जात असे तेव्हा सर शिपायास म्हणत, ‘सावकाश जा आणि लगेच परत ये.’ वाक्य साधे सोपे पण अर्थपूर्ण. स्वत:च्या मुलापेक्षाही त्याला घेऊन जाणाऱ्या शिपायाबद्दलचा सरांचा आदर आणि काळजी मला नेहमीच आदर्शाची पाऊलवाटच वाटली. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या प्रमुख डॉ. चित्रा नाईक यांनी महाविद्यालयास १९७१ साली भेट दिली तेव्हा सरांनी सगळ्या प्राध्यापकांची ‘हे सर्व माझे विश्वासू सहकारी’ अशी वैयक्तिकपणे ओळख करून देत असताना माझ्या खांद्यावर हात ठेऊन 'He is my baby staff member' अशी माझी ओळख करून दिली होती! सर, अंबेजोगाई महाविद्यालय परिसर, त्याच प्रमाणे त्या लहानशा शहरासाठी सुद्धा अतिशय लाघवी आणि आदरणीय व्यक्तिमत्त्व होते.

डॉक्टरेट पूर्ण केल्यानंतर नागपूरला मी भारत सरकारच्या राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेत शास्त्रज्ञ म्हणून नोकरीला लागलो. १९७९ चा तो काळ. एवढी छान नोकरी पण संशोधनाबरोबरच मला अध्यापनाची आवड, जीव कोंडू लागला आणि अचानक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाची जाहिरात वाचण्यात आली. खाली म. द. नाडकर्णी प्राचार्य हे नाव वाचले आणि मनस्वी आनंद झाला. सरांना पत्र लिहून मी माझी इच्छा व्यक्त केली. या महाविद्यालयात सुद्धा मला सरांचा एकच वर्ष सहवास मिळाला. अंबेजोगाईच्या ग्रामीण विज्ञान महाविद्यालयामधून मुंबईच्या सिमेवर असलेल्या ठाणे शहराच्या विज्ञान महाविद्यालयात येऊन

विचार न करता शिकणे हे निरुपयोगी असते, तर न शिकता विचार करणे हे धोकादायक असते.

अध्यापन करण्याची मला सुरवातीस मनस्वी भीती होती पण सरांनी आत्मविश्वास दिला. 'तू तुझ्या विषयात पूर्णपणे ज्ञानी असशील तर जगाच्या पाठीवर तू कुठेही तुझा हा विषय शिकवू शकतोस आणि ही तर सर्व माझीच मुले आहेत.' आपल्याला जमू शकेल का? हा माझ्या मनातील प्रश्न सरांनी अगदी सहज काढून टाकला होता. या नवीन महाविद्यालयात आल्यावर सरांनी मला 'कलाविभाग' सांभाळण्यास दिला. स्नेह संम्मेलनाचे अतिशय उत्तम सादरीकरण झाले, अनेक विद्यार्थ्यांना आनंद व्यक्त करताना शिस्तीचे पालन करता आले नाही, सरांना स्टेज समोर विद्यार्थ्यांच्या समुहात त्यांना शिस्तीची व्याख्या सांगण्यासाठी जावे लागले. माझ्यासाठी तो दुःखाचा प्रसंग होता. दुसरे दिवशी सरांनी माझी समजूत काढली आणि म्हणाले, 'यातून तू बरेच काही शिकला आहेस हे माझ्या लक्षात आले आहे, अंबेजोगाई आणि ठाणे यात फरक आहे एवढे लक्षात घेतलेस की प्रश्न सहज सुटेल'. सरांचे ते शब्द त्यावेळी माझ्यासाठी खूप प्रेरणादायी होते. पुढील चार वर्षात बांदोडकर महाविद्यालयाचा मुंबईमध्ये नाट्य आणि कला क्षेत्रात मोठा दबदबा निर्माण करण्यात याच प्रेरणेचा मला फार उपयोग झाला. सर या महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले, पण माझ्यासाठी नव्हते. त्यांची माझी खरी गट्टी जमली ती ठाणे प्रज्ञा शोध परीक्षेकरता. सरस्वती मंदिरचे मुख्याध्यापक अशोक टिळक आणि नाडकर्णी सरांनी पुढील सात-आठ वर्ष ठाण्यामधील अनेक प्रज्ञावंतांना शालेय जीवनापासूनच त्यांच्या बुद्धांकात विकसित केले. सरांच्या मार्गदर्शनाखाली मी तेथे नियमित वर्ग घेत असे. एक-दोन वेळेस मला वर्गाला जाता आले नाही आणि त्यांना कळवता सुद्धा आले नाही. काय अडचण असावी? हे शोधण्यासाठी सर ठाण्यामधील त्यांच्या घरापासून मुलुंड पश्चिमेकडील माझ्या घरापर्यंत चालत आले! तो दिवस माझ्यासाठी कायम वेदनादायक ठरला. 'अरे! तुझी चौकशी करण्यासाठी आलो' हे त्यांचे शब्द आणि पाठीवरचा हात आजही या क्षणीसुद्धा माझ्या डोळ्यांमधील अश्रूंना थांबवू शकत नाही.

साने गुरुजींचा मनापासून आदर करणारे सर त्यांच्या संपूर्ण खादीच्या वेषामध्ये मला जास्त प्रिय होते. शिस्त, वेळेचा काटेकोरपणा, दिलेला शब्द पाळणे आणि विद्यार्थ्यांवर मनापासून प्रेम करणे, त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी मदतीसाठी धावून जाणे या त्यांच्या संस्कारांनी मला घडविले. कोणीही तुमच्याशी कसाही वागला तरी आपले काहीही चुकले नसेल तर उत्तरास प्रत्युत्तर कधीही देऊ नये; हे सुद्धा त्यांनीच मला शिकविले. आपण ज्या वास्तुमध्ये सेवा देत असतो तिच्याशी नेहमी प्रामाणिक रहावे, तिच्या चांगल्यासाठी योगदान द्यावे, ही त्यांची शब्दसुमने आजही मला सुगंध देतात. सरांनी जळगावच्या मुळजी जेठला महाविद्यालयास प्रेरणास्थान समजून अंबेजोगाईच्या महाविद्यालयास वैभवाच्या शिखरावर पोहोचविले. याच शिखरावरून आज जेव्हा मला विद्या प्रसारक मंडळाचे ज्ञानद्विप आणि त्यातील बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे कोंदण दिसते तेव्हा मला या महाविद्यालयाच्या पहिल्या प्राचार्यांची म्हणजेच सरांची आठवण येते. व्यक्तीचे कर्तव्य त्यांच्या निष्ठेमधून, कार्यातून दिसते. महाविद्यालयाची पायाभरणी सरांनी केली, त्याची इमारत आणि कळस निर्मितीमध्ये अनेकांचे योगदान आहे. पण यामध्ये मूळ पायाभरणीमध्ये एका शिक्षण तज्ज्ञाचा, एका बहूआयामी संताचा म्हणजे सरांचा मोलाचा वाटा होता. सरांना आदराने भेटण्यासाठी मी त्यांच्या आंबेजोगाईमधील महाविद्यालयामधील प्रांगणाच्या निवासस्थानाच्या पायऱ्या अनेक वेळा चढलो आणि कितीतरी बहुमोल संस्कार घेऊन परत उतरलो, अशाच पायऱ्या त्यांच्या विष्णूनगर मधील निवासस्थानाच्या सुद्धा चढलो होतो तेव्हा मनात चलबिचल होती, ठाण्यास

(पृष्ठ क्र. ३४ वर)

# प्राचार्य म. द. नाडकर्णी एक शिक्षणव्रती

प्राचार्य नाडकर्णी सर विद्या प्रसारक मंडळाच्या कला-वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून १९७१ मध्ये रुजू झाले आणि ठाणे शहराच्या शैक्षणिक वातावरणात नवचैतन्य आणि नवसंकल्पनांचा उदय होण्यास आरंभ झाला. मी वरील शब्दांचा वापर जाणीवपूर्वक करतो आहे. कारण त्याच काळात शिक्षणक्षेत्रात अभ्यासक्रमाबरोबर रचनेमधील बदलाची सुरुवात होत होती. इयत्ता ११वी नंतर होणारी शालांत परीक्षा आता १०वीच्या वर्षअखेरीस होणार होती आणि त्यापुढील दोन वर्षे ही उच्च माध्यमिक शिक्षणक्रमाची असणार होती. हा बदल वर्ष १९७५ च्या पहिल्या १० वी शालांत परीक्षेनंतर जरी होणार होता तरी त्याचा आरंभ शैक्षणिक वर्ष १९७२-१९७३ पासून होणे आवश्यक होते. रचनेतील या बदलाबरोबर सामान्यविज्ञान या एकत्रित विज्ञान अभ्यासाचे भौतिकशास्त्र-रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र अशा तीन स्वतंत्र शाखांतून विभाजन झाले. शालेय विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकीय अभ्यासाबरोबर प्रयोग शाळेत जाऊन स्वतः प्रयोग करणे आवश्यक ठरविण्यात आले. गणित विषयामध्ये बीजगणित आणि भूमिती या स्वतंत्र अभ्यासक्रमांनी सामान्य गणित या विषयाची जागा घेतली. गणिताच्या रूढ पद्धतीतील त्रैराशिक-पंचराशिक मांडणीच्या जागी नवीन संचपद्धतीचा (Set theory) समावेश करण्यात आला. हे सर्व बदल स्वीकारण्याची शिक्षकांची मानसिक बैठक तयार करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणाचे कार्यक्रम तयार केले गेले आणि या प्रशिक्षणाची जबाबदारी वरिष्ठ महाविद्यालयांवर सोपविण्यात आली आणि याच संक्रमणाच्या काळात प्राचार्य नाडकर्णी सरांमधील जातिवंत शिक्षक प्रकर्षाने जाणवू लागला. या पार्श्वभूमीवर सरांचे नेतृत्व आणि शिक्षणाविषयीची तळमळ जाणवू लागली.

कोणतीही नवी व्यवस्था काही आपोआप अस्तित्वात येत नाही. त्यासाठी सातत्याने संपर्क, समविचारी व्यक्तींमधील वैचारिक आदानप्रदान आणि आपल्या रूढ कार्यक्षेत्राच्या बाहेर पडून तळमळीने काम करण्याची आंतरिक ऊर्मी असणे आवश्यक असते. प्राचार्य नाडकर्णी हे असे एक वेगळे व्यक्तिमत्त्व ठाणे महानगरास योगायोगाने लाभले, की ज्यांनी माध्यमिक शालेय जगताला नवीन आव्हानांचा सामना करण्याचे नैतिक बळ दिले. ठाणे जिल्हा मुख्याध्यापक संघटनेबरोबर सातत्याने चर्चा-वैचारिक आदानप्रदान करून एक उत्तम समविचारी अनुभवी शिक्षकांचा समूह प्रस्थापित करण्यात सरांनी घेतलेले परिश्रम बदलत्या अभ्यासक्रमाची आव्हाने पेलण्यास, शाळांना सक्षम करण्यास उपयुक्त ठरले.

### शिक्षक प्रशिक्षण वर्ग

शिक्षकांसाठी महाविद्यालयाच्या विज्ञानशाखेच्या प्रयोगशाळा उपलब्ध करून देणे, गणित विषयाच्या प्रशिक्षकांसह प्रशिक्षण व्यवस्था करणे या कामांत सरांचे कुशल नेतृत्व व विषयाबद्दलची आस्था यांचा सम्यक अनुभव आला.

### शाळा समूह योजना

महाविद्यालय आणि शाळा यामध्ये सातत्यपूर्ण संवाद आवश्यक आहे ही आग्रही विचारधारा व शिक्षणाच्या प्रगतीसाठी ती नितांत गरजेची आहे हा विचार शिक्षणसंस्था-मुख्याध्यापक-शिक्षक यांच्या गळी उतरविण्यात सरांनी केलेले प्रबोधन पुढे मूर्त रूपात ठाणे जिल्ह्यात पहायला मिळाले. शाळांचे समूह तयार करून परस्पर सहकार्यामधून प्रगती या विचाराने मूळ धरले. परिणामी शाळाशाळांमधून सहकार्याची भावना वृद्धिंगत होऊ लागली.

त्या काळात शालांत परीक्षेतील गुणवत्ता यादीला फार मानाचे स्थान होते. सरांच्या प्रेरणेने गुणवत्ता विकासाचा सर्वसमावेशक कार्यक्रम ठाणे महानगर क्षेत्रासाठी सुरू करण्यात आला आणि आश्चर्य म्हणजे एका वर्षी ठाणे शहरातील शाळांतून एकूण २१ विद्यार्थी गुणवत्तायादीत झळकले. शाळा समूहाचा कल्पनेतून एकत्र सामायिक परीक्षा प्रकल्प, क्रीडास्पर्धा-विविध गुणदर्शन कार्यक्रम-शिक्षक आदानप्रदान अशा गोष्टींचा आरंभ झाला आणि खऱ्या अर्थाने परस्पर सहकार्याचे नवीन पर्व सुरू झाले. या सर्व कल्पनांमध्ये सरांचा असणारा सक्रीय सहभाग आणि महाविद्यालयीन शिक्षकांकडून मिळणारे मार्गदर्शन प्रेरक ठरले.

**ठाणे प्रज्ञाशोध केंद्राची निर्मिती**

भारत सरकारने देशपातळीवर कुशाग्र बुद्धीच्या नवतरुणांचा शोध घेऊन, त्यांना राष्ट्रीय संपत्तीमानून त्यांचे प्रशिक्षण व प्रतिभा संवर्धन व्हावे यासाठी 'राष्ट्रीय प्रज्ञाशोध' परीक्षेच्या माध्यमातून निवड करून शिष्यवृत्ती देण्यास आरंभ केला. सुरूवातीला विज्ञानशाखेतील आवड व मूलभूत विज्ञानातील संशोधनास प्रोत्साहन देण्याचे दृष्टीने या शिष्यवृत्तीस 'विज्ञान प्रज्ञा शोध' असे संबोधण्यात आले. मात्र पुढे ही शिष्यवृत्ती ज्ञानाच्या सर्व शाखांकरिता दिली जाऊ लागली.

प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती परीक्षेचे प्रशिक्षण वर्ग ठाणे शहर व परिसरातील माध्यमिक शाळांतील कुशाग्र बुद्धीच्या विद्यार्थ्यांना देऊन त्यांच्यातील गुणवंतांचा शोध घेण्याची कल्पना नाडकर्णी सरांनी मांडली व इयत्ता ८ वी, ९ वी आणि १० वी अशी तीन वर्षे प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम व अभ्यासक्रम तयार केला. इयत्ता ८ वी वर्गांसाठी ठाणे महानगरातील माध्यमिक शाळांतील गणित-विज्ञान-सामाजिक शास्त्रे आणि बुद्धिमत्ता चाचणी या विषयांसाठी हुशार उत्साही शिक्षकांची, तर इयत्ता ९ वी-१० वीसाठी कनिष्ठ महाविद्यालये व महाविद्यालयात शिक्षकांना आमंत्रित करण्यात आले. कोणत्याही प्रकारे व्यावसायिकता येऊ न देता निखळ शिक्षण व उत्कृष्टाचा शोध या भूमिकेतून हे वर्ग चालविले जाऊ लागले. ठाणे शहरातील सरस्वती मंदिर ट्रस्ट या संस्थेने तिची शालेय वास्तू व सर्वप्रकारचे प्रशासकीय कर्मचारी उपलब्ध करून दिले. या वर्गाचा शहराला खूप उपयोग झाला, अनेक गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळविते झाले.

प्राचार्य नाडकर्णी हे खऱ्या अर्थाने या उपक्रमाचे प्रणेते, मार्गदर्शक व पालक होते. या प्रत्येक उपक्रमातील सरांचा सहभाग काम करणाऱ्या सर्वांना प्रेरणा देणारा असे.

प्राचार्य म. द. नाडकर्णी यांनी नेहमीच शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण व्यवस्था यांच्या उन्नयनासाठी घेतलेले परिश्रम चिरस्मरणीय ठरोत.

**- अशोक टिळक**
६, जेरी अपार्टमेंट, ग्रीन रोड, लुईसवाडी,
ठाणे (प) - ४०० ६०४
Email :ashoktilaksir@gmail.com

**लेखक परिचय** : अशोक गोपाळ टिळक, मुख्याध्यापक सरस्वती सेकंडरी स्कूल, नौपाडा. अशोक टिळक सर हे वर्ष १९६९ ते वर्ष २००० अशी सलग ३१ वर्षे सरस्वती सेकंडरी स्कूल या मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. सरांच्या कुशल नेतृत्वाखाली मराठी माध्यमाच्या 'सरस्वती' शाळेचा नावलौकिक संपूर्ण महाराष्ट्रात पसरला. नवनवे शैक्षणिक प्रयोग करून त्यांनी शिक्षणक्षेत्रात मान्यता मिळविली. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल त्यांना राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले (वर्ष १९९५). वर्ष १९९६ मध्ये वसंतराव नाईक प्रतिष्ठानकडून शिक्षणक्षेत्रातील मान्यवर व्यक्ती म्हणून त्यांना गौरविण्यात आले. वर्ष २०१३ मध्ये ठाणे महानगर पालिकेचा 'ठाणे भूषण' पुरस्कार टिळक सरांना प्रदान करण्यात आला. निवृत्तीनंतर सर सरस्वती मंदिर ट्रस्टचे विश्वस्त व पुढे कार्यकारी विश्वस्त म्हणून शिक्षणक्षेत्रात कार्यरत राहिले. वयाच्या ७५ नंतर सर वरील पदावरून स्वेच्छेने निवृत्त झाले आहेत.

●●●

# तेजस्विता आणि व्रतस्थता यांचा एक मूर्तिमंत उद्‌गार!

तत्त्वनिष्ठा हेच ज्यांच्या अवघ्या आयुष्याचं वर्णन करता येईल असं व्यक्तिमत्त्व गुरुवर्य प्राचार्य म. द. नाडकर्णी यांच्या रूपानं आम्हा विद्यार्थ्यांना आरंभीच लाभलं. तेव्हा जोशी-बेडेकर-बांदोडकर हे त्रिदल एकत्र होतं आणि केवळ वर्ष दीड वर्षेच सर आम्हाला प्राचार्य म्हणून लाभले. जवळ जवळ चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी प्रत्यक्ष अनुभवलेलं नाडकर्णी सरांचं व्यक्तिमत्त्व मात्र अगदी सकाळी भेटल्यासारखं मनात ताजं टवटवीत आहे.

गंमत म्हणजे प्राचार्य म. द. नाडकर्णी सर केबीनमधले नि केबिनबाहेरचे दोन्ही स्मरतात. सतत व्यवहारी कामात गुंतलेले, एकाग्र मनाने कार्यव्यग्र असणारे सर केबीनबाहेर दिसले की त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदरयुक्त धाकानं विद्यार्थी एकदम गप्प होत असत; पण त्याही भेटीत सरांना एखाद्या विद्यार्थ्याची समस्या त्याच्या चेहेऱ्यावर दिसली की सरांमधील वत्सल पित्याचे दर्शन घडे. ते त्या विद्यार्थ्याजवळ येऊन 'तू अडचणीत दिसतो? काही अडचण असेल तर न संकोचता भेट मला' हे सांगत असत.

त्याच सुमारास त्यावेळच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या झाली. विलक्षण तणाव निर्माण झाला. 'कॉलेज बंद करा! बंद करा!' असा आरडाओरड करीत झुंड कॉलेजमध्ये शिरली. मी तर अगदीच तणावात. कॉलेजचं पहिलंच वर्ष. माझं वय वर्षे सतरा. असं काही घडतं हेही बुद्धिच्या पलीकडलं. आता काहीतरी भयानक घडणार याच भयाचं दडपण.

त्यात परीक्षा सुरू होती. पेपर पूर्ण व्हायला दोन तास होते. कॉलेज बंद करून चालणार नव्हतं आणि झुंडीला कॉलेज सुरू असणं नको होते. ह्या तणावात आदरणीय प्राचार्य नाडकर्णी सर हे बाजीप्रभूने खिंड लढवावी त्या आवेशात उभे राहून जमावाला सांगत होते, 'वार्षिक परीक्षेचा पेपर सुरू आहे. तो पूर्ण झाल्याशिवाय कॉलेज बंद होणार नाही!'

प्राचार्य नाडकर्णी सरांचे ते करारीपण, तेजस्वी बाणेदार शब्द ऐकून जमाव मान खाली घालून निघून गेला. हा अनुभव मनावर कोरला गेला आहे. चारित्र्याचं आणि व्रतस्थतेचं तेज असणारी अगदी मोजकीच व्यक्तिमत्त्वे माझ्या आयुष्यात आली, त्यातलेच गुरुवर्य प्राचार्य नाडकर्णी सर! आज शताब्दीक्षणी त्यांच्या अमोघ व्यक्तिमत्त्वाला आदरांजली अर्पण करण्याची व कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली हाही प्रसादच!

**– प्रवीण दवणे**

•••



स्टुडण्ट कौन्सिल (१९७४)

# माझ्या आठवणीतील आदरणीय प्राचार्य श्री. नाडकर्णी सर

महाविद्यालयात सेवेला रुजू झाल्यानंतर सुरुवातीच्या काळातील माझ्या जडणघडणीत ज्यांचा मोलाचा वाटा आहे, ज्यांच्याविषयी मला नितांत आदर आहे, ते म्हणजे प्राचार्य श्री. नाडकर्णी सर.

मी, श्रीमती शीला गजानन टेंबे. १ जून १९६९ ला कला विज्ञान वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना झाली. प्राचार्य म्हणून के. जी. बेडेकर यांची नियुक्ती झाली आणि कार्यालयीन कामासाठी १२ जून १९६९ ला माझी ज्युनियर क्लार्क म्हणून नेमणूक झाली. त्यानंतर १ जून १९७१ ला प्राचार्यपदी म. द. नाडकर्णी सर रुजू झाले. ते पुढे दहा वर्षे म्हणजे ३० नोव्हेंबर १९८० पर्यंत या पदावर कार्यरत होते.

मी मूळची जळगावची. श्री. नाडकर्णी सर माझ्या मोठ्या बहिणीला शिकवायला होते. त्यामुळे सहाजिकच मला आनंद झाला. पुढे सरांच्या वर्तनातून हा आनंद कायमस्वरूपी आदरात रूपांतरित झाला.

प्राचार्यपदी नेतृत्वपदी अत्यंत योग्य अशी व्यक्ती म्हणजे श्री. नाडकर्णी सर. सर रोज १० ते ५ महाविद्यालयात उपस्थित असत. प्रशासनावर त्यांची पकड जबरदस्त होती. सर कायम पांढरे शुभ्र खादीचे कपडे वापरीत असत. स्टाफवर हुकूमत न गाजवता, त्यांना समजून घेत काम करून घेण्याची त्यांची हातोटी होती. यामुळे सर्व प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांना सरांविषयी आदरयुक्त दरारा असे.

सरांचा केबिनचा दरवाजा कायम उघडा असे. चांगलं काम करणाऱ्याचे कौतुक करण्याचा सरांचा स्वभाव असल्याने, सर्व स्टाफचे मनापासून काम करण्याकडे कल असे व त्यांना प्रोत्साहन मिळत असे. सरांनी १९७८ साली स्टाफ मीटिंगमध्ये माझ्या कामाचे केलेले कौतुक आजही माझ्या मनात आनंद देऊन जाते.

विद्या प्रसारक मंडळामध्ये हेडक्लार्कच्या प्रमोशनसाठी सरांनी माझी शिफारस केली होती. आपल्या कामाची पावती मिळाल्याचे भाग्य मला सरांमुळे लाभले. सरांची मी खरंच ऋणी आहे.

अतिशय शांत, कधी न चिडणारे सर, कोणी आजारी असेल तर घरी जाऊन विचारपूस करत असत. सर अमेरिकेत त्यांच्या मुलाकडे गेले असता, माझ्यासाठी एक भेट म्हणून पेन आणलं होतं. पुढे बरीच वर्ष मी ते पेन जपून ठेवले होते.

१९८० मध्ये सर सेवानिवृत्त झाले, त्यावेळी काही अपरिहार्य कारणास्तव मी उपस्थित राहू शकले नाही, याचे दुःख आजही मला होत आहे.

१९७१ ते १९८० अशी दहा वर्षे सरांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली, म्हणून मी स्वतःला कृतकृत्य समजते.

**– शीला गजानन टेंबे**

•••

**मार्च २०२१ महिन्यातील 'परिसर वार्ता' एप्रिल २०२१ च्या अंकात छापण्यात येईल.**

**– संपादक**

# आमचे नाडकर्णी सर

प्रिन्सिपॉल नाडकर्णी सर आम्हा बांदोडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थी वर्गातले एक अतिशय आवडते व्यक्तिमत्त्व. २०२१ साल सरांचे जन्मशताब्दी वर्ष हे कळल्यावर मन ४०-५० वर्षे मागे गेले आणि सरांच्या अगणित आठवणी स्मरू लागल्या. सन १९७१-७२ चा काळ, महाविद्यालय नवीनच उघडलेले. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामधून बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाला स्वतंत्र दर्जा मिळाला. आधीचे प्रिन्सिपॉल हे कला शाखेचे असल्यामुळे विज्ञान महाविद्यालयाला विज्ञान शाखेचे कोण प्रिन्सिपॉल येणार याची विद्यार्थ्यांना उत्सुकता होती आणि नाडकर्णी सर नवे प्रिन्सिपॉल म्हणून रुजू झाले. प्रथम आम्ही नाडकर्णी सरांना दुरूनच वंदन करत असू. एक प्रकारचे दडपण वाटायचे. पण सरांचे व्यक्तिमत्त्वच इतके साधे आणि चेहऱ्यावर मृदू हास्य, सरांनीच विद्यार्थ्यांना जवळ बोलवून नाव, वर्ग विचारून दडपण कमी केले. सर छोट्या छोट्या गोष्टींमध्ये प्रोत्साहन व शाबासकी द्यायचे. त्यामुळे आम्ही विद्यार्थीही कुठल्याही समस्येत सरांच्या केबीनकडे धाव घेत असू. सरांनी कधी मला 'आता वेळ नाही, नंतर या' असे बोललेले माझ्या आठवणीत नाही. यामुळे आम्हा विद्यार्थ्यांना फार आदर व आत्मियता वाटत असे.

सरांचा केमिस्ट्री विषय शिकवण्यात हातखंडा. आम्हाला ते ऑरगॅनिक केमिस्ट्री शिकवत. अतिशय क्लिष्ट विषय फार इंटरेस्टिंग नि सोपा करून शिकवत. (ही सरांची शिकवणी मी स्वतः शिक्षक झाल्यावर आचरणात आणली.)

त्यावेळी विद्यार्थ्यांची संख्या फार मर्यादित होती. वर्गात कमी उपस्थिती असल्याचं लगेच लक्षात यायचं. सरांच्या हे लक्षात आले की काही मुले ठरावीक दिवशी येतात, बाकी दिवशी अनुपस्थित राहतात. सरांनी त्या मुलांना वैयक्तिकरित्या बोलवून त्यांच्या समस्या विचारल्या. ही मुले घरच्या परिस्थितीमुळे नोकरी करायची व जमेल तेव्हा वर्गात उपस्थित राहायची. सरांनी त्या मुलांची स्वतंत्र प्रॅक्टिकल व जादा लेक्चर्स घेऊन अभ्यासक्रम कसा पुरा करून घेता येईल याकडे लक्ष दिले. यामुळे बरेच विद्यार्थी आपले ग्रॅज्युएशन पुरे करू शकले! त्याचे श्रेय सरांनाच जाते.

लेक्चर्स चालू असताना विद्यार्थी इकडे-तिकडे भटकत नाहीना याकडे त्यांचे फार लक्ष असायचे. त्या वेळात ते कॉरिडॉरमध्ये राऊंड घ्यायचे व आम्ही बाहेर फिरताना दिसलो तर कारण विचारून वर्गात पाठवायचे. सर कॉरिडॉरमध्ये असतात हे कळल्यामुळे आपोआप विद्यार्थ्यांची उपस्थिती वर्गात वाढली.

सर कधी चिडत किंवा ओरडत नसत. शांतपणे समस्या सोडवण्याकडे त्यांचा कल असे. त्यामुळे एक आदरयुक्त दरारा वाटत असे. खूप मुले त्यांना 'आमचे बाबा' असेच म्हणत!

माझ्या विद्यार्थीदशेत मला जे काही यश मिळाले त्याचे बरेचशे श्रेय नाडकर्णी सरांना जाते. माझ्याकडे माझे कौतुक करणारे, त्यांची वळणदार सही असलेले एक पत्र आहे. ते जेव्हा जेव्हा मी पाहते माझे मन भरून येते व मी देवाला असे गुरूवर्य मला दिल्याबद्दल आभार मानते व मनोमन सरांना वंदन करते.

'सर तुम्हीच आहात आम्हा विद्यार्थ्यांच्या जीवनाचे खरे शिल्पकार'

**– डॉ. नंदिनी पाटील**

•••

# प्राचार्य म. द. नाडकर्णी सर - एक अनुभव चिंतन

स्वर्गीय, आदरणीय, माजी प्राचार्य, नाडकर्णी सर यांचे संपूर्ण नाव मधुसुदन दत्तात्रय नाडकर्णी असे होते. त्यांचे संपूर्ण नाव अजूनही माझ्या मुखावर असण्याचे कारण म्हणजे, मी ठाणे महाविद्यालयाची पहिल्या बॅचची सायन्स शाखेची ग्रॅज्युएट विद्यार्थिनी. पूर्वाश्रमीची जयश्री ठकार. आणि सायन्स महाविद्यालय वेगळे झाल्यानंतर १ जुलै १९७६ पासून बा. ना. बांदोडकर महाविद्यालयाची एक कार्यालयीन कर्मचारी मंजिरी धर्माधिकारी होय.

या कार्यालयात त्यांच्यामुळेच माझे आगमन झाले हे मी आवर्जून इथे नमूद करू इच्छिते. माझ्याकडे पहिल्यापासून सर्व्हिसबुक, रजा, पगार बिल, इनकम टॅक्स इ. अनेक कामं नाडकर्णी सरांनी हक्काने दिल्यामुळे सगळ्या शिक्षकांची पूर्ण नावे, शिक्षण, जन्मतारीख, पगार इ. सर्व माहिती मला पाठ होती आणि अजूनही आहेत. इतकी मी माझ्या महाविद्यालयीन नोकरीत अगदी रममाण झाले होते. मी या नोकरीत अगदी स्वतःला वाहून घेतले होते. सर मला जे जे काम सांगत होते ते शिकून घेऊन मी अगदी मनापासून करत होते व सरांची शाबासकीही मिळवत होते. कारण म्हणतात ना की मनापासून केलेले कोणतेही काम हे नेहमी चांगलेच होते.

बा. ना. बांदोडकर महाविद्यालयात माझा नोकरी करण्यासाठी झालेला प्रवेश अगदी योगायोग म्हटला तरी चालेल असाच होता.

तसं पाहिलं तर या महाविद्यालयात शिकत असताना मी काही फार हुशार अशी विद्यार्थिनी नव्हते; सर्वसाधारणच होते. पण खूप मेहनत घेण्याची तयारी आणि प्रामाणिकपणा हे दोन गुण मात्र अंगी होते. कदाचित यामुळेच मला ही नोकरी मिळाली असावी.

आमची बीएस्सी.ची पहिली बॅच आणि माझा 'केमिस्ट्री' हा मुख्य विषय होता. आम्हाला सर "Organic Chemistry" हा विषय शिकवत होते; त्यामुळे F.Y.B.Sc. ते T.Y.B.Sc. अशी सतत ३ वर्षे मी सरांच्या चांगलीच नजरेत आणि सहवासात होते. Organic केमिस्ट्री हा विषय तसा किचकट आणि अवघडच. पण सरांची शिकवण्याची पद्धत सोपी असल्यामुळे आम्हाला तो चांगला समजायचा. मी तर केवळ सरांमुळेच हा विषय निभावून नेला हे अगदी प्रामाणिकपणे इथे सांगू इच्छिते. वर्गात शिकवताना त्यांचा आवाज हळू आणि भाषा मृदू असायची. सरांचे फळ्यावर अक्षर सुंदर, स्वच्छ आणि सुटसुटीत असायचे. त्यामुळे समजायला सोपे जायचे. सर आम्हाला नोट्स लिहून देत असत आणि त्याचा मार्क्स मिळविण्यात आम्हाला चांगला उपयोग व्हायचा. सर शिकवत असाताना वर्गात अगदी निःशब्द शांतता असायची.

त्यांनी शिकवलेली "Benzene ring" आणि त्याच्याशी निगडित असणारी सर्व Structures अजूनही माझ्या डोळ्यांसमोर तरळत आहेत. या ring चे Structure लक्षात ठेवण्याचे, अचूक तंत्र त्यांनी आम्हाला सांगितले होते. त्यामुळे आमची grasping capacity पण वाढली आणि आमचे मार्क्सही वाढायला लागले होते.

सर स्वभावाने शांत आणि मनमिळावू होते; तरीसुद्धा वडिलकीच्या नात्याने आम्हाला त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती वाटत असे. त्यांच्यासमोर जास्त काही बोलायची आमची इच्छा असली तरी प्राज्ञा नक्कीच नव्हती. त्यांचा बोलका चेहरा, मृदू स्वभाव, साधा खादीचा पेहराव, विद्यार्थ्यांवर असलेली करडी चौफेर नजर, शिस्तप्रियता, अन्यायाची चीड हे त्यांच्या 'यशस्वी करियर' चे गमक होते.

नम्रता ही शिक्षणाची पहिली पायरी आहे.

त्यांची वर्गातील अभ्यासपूर्ण लेखणी, प्रसंगानुरूप कौशल्यपूर्ण भाषाशैली अगदी वाखाणण्यासारखी होती. त्यामुळे मी अभिमानाने सांगू इच्छिते की आमचे नाडकर्णी सर, आमच्या सर्व विद्यार्थ्यांचे ''आदर्श सर आणि प्राचार्य'' होते.

अभ्यासाइतकेच ते आम्हाला महाविद्यालयातील इतर उपक्रमांत भाग घेण्यास उद्युक्त करत असत. त्यामुळे त्यावेळी बॅडमिंटनसारख्या खेळांच्या स्पर्धामध्ये व सोशल गॅदरिंगमध्ये आम्ही भाग घेऊन त्यात आनंद मिळवत होतो.

बी.एस्सी. झाल्यानंतर काही काळ मी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये सायन्स शिक्षिका म्हणून कार्यरत होते. ही नोकरी संपल्यानंतर मी काही काळ घरीच होते. अशीच एकदा कॉलेजची आठवण आली आणि मी कॉलेजमध्ये माझ्या इतर सरांना भेटायला गेले. तसेच नाडकर्णी सरांचीही केबीनमध्ये जाऊन भेट घेतली. साधारण मार्च १९७६ चा काळ होता तो. तेव्हा सरांनी माझी सर्व विचारपूस केली आणि हसत हसत विचारले की तुझा काय अनुभव आहे? वर्गात शिकवणे सोपे की शिकणे? त्यावर मी लगेच उत्तर दिले की शिकवणे अतिशय कठीण आहे! मला कधीही शिकायलाच आवडेल!

बोलता बोलता सरांच्या लक्षात आले की मी आता रिकामीच आहे घरी आणि त्यांनी माझ्या समोर कॉलेजमधील सुपरव्हिजन करण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडला. मी घरीच असल्यामुळे आणि त्या निमित्ताने रोज कॉलेजला यायला मिळेल या उद्देशाने या प्रस्तावास मी होकार दिला. त्यांनी त्यावेळी ताबडतोब कार्यालयातील Head-Clerk सौ. टेंबे यांना केबीनमध्ये बोलावून मला मार्च ७६ ते जून ७६ पर्यंत असतील त्या सर्व सुपरव्हिजन allot करण्याचे आदेश दिले. मी हे दिलेले काम अगदी प्रामाणिकपणे आणि उत्तमरित्या करून दाखवले होते. सर्व सुपरव्हिजन संपल्यानंतर पुन्हा शेवटचे म्हणून भेटण्यासाठी मी सरांच्या केबीनमध्ये गेले. ३ महिने मी सतत सरांच्या नजरेसमोर असल्यामुळे त्यांच्या चांगलीच लक्षात राहिले होते आणि खरोखरच त्या दिवशी सरांनी मला अगदी आश्चर्याचा धक्काच दिला. सरांनी मला या कार्यालयात तुला काम करायला आवडेल का? असे विचारले. यावर कार्यालयीन कामाचा काही परिचय आणि अनुभव नसल्यामुळे, मनात खूप धाक-धूक असूनही केवळ सरांकरिता मी 'हो करीन' असे आनंदाने उत्तर दिले. मग काय! नंतर रीतसर Interview Letter माझ्या घरी पाठवले गेले. माझा Interview घेतला गेला आणि मी त्यात यशस्वी होऊन माझी या कॉलेजमधील कार्यालयीन कामकाजासाठी निवड झाली. अशा रीतीने सरांच्या उपस्थितीत एका विद्यार्थिनीची (माझी) या कार्यालयात नेमणूक झाली. केवढे हे माझे भाग्य. बघता बघता एक विद्यार्थिनी व कार्यालयीन कर्मचारी या दुहेरी नात्याने मी सरांशी जोडली गेले. हे नाते पुढे आणखीनच विकसित होत गेले हे इथे वेगळे सांगायला नकोच, नाही का!

नोकरीत असतांना, ते जसे हक्काने मला सर्व कामे सांगत असत, तसेच ते मला हक्काने विद्यार्थी दशेतील जयश्री या नावाने संबोधत असत. त्यामुळे आमचे नाते पण परकेपणाचे नसून जवळकीचे होते; हे सांगतानासुद्धा मन अगदी आनंदाने भरून येत आहे. त्यांच्या मनात माझ्याविषयी जशी विश्वासाची एक जागा होती तशीच माझ्या मनात त्यांच्याविषयी आदराची आणि अप्रूपतेची एक जागा अजूनही आहे.

आजही सरांच्या समवेत घालवलेली ती वर्षे डोळ्यांसमोर आठवणींच्या रूपात स्पष्ट दिसत आहेत. एवढा सरांचा माझ्यावर प्रभाव पडला होता.

सर गेले तेव्हां आम्हा सर्वांना खूप मोठा धक्का बसला होता. एक पोकळी आमच्या जीवनात निर्माण झाली होती. आम्ही त्यांच्या अंत्यदर्शनासाठी सर्वजणी

(पृष्ठ क्र.३७ वर)

# पितृतुल्य प्राचार्य म. द. नाडकर्णी !

१९७०-७१ चा तो काळ असेल. जांभळी नाक्यावर मालतीबाई चिटणीस प्रसुतीगृहासमोर कुलकर्णी सरांचा क्लास भरत असे. त्याच जागेवर दर रविवारी समाजवादी संघटनेचा (युवक) अभ्यासवर्ग होत असे. मोठ मोठे वक्ते, साहित्यिक यांची व्याख्याने होत असत. माझा मोठा भाऊ त्या संघटनेचा नियमित सभासद होता. एका रविवारी प्रसिद्ध लेखक प्राध्यापक नरहर कुरुंदकर यांचे व्याख्यान होते. माझ्या भावाबरोबर मीही त्या व्याख्यानाला गेले होते. व्याख्यान सुरू होण्याआधी एकमेकांशी बोलत, ओळखी करून घेत गप्पा चालू होत्या. माझा भाऊ एका व्यक्तीसमोर नमस्कार करून बोलू लागला. पांढरे शुभ्र खादीचे कपडे, उंच देहयष्टी, चेहरा करारी, पण ऋजू व्यक्तिमत्त्व यांचा सुरेख संगम! अगदी मनोमन आदर वाटावा असे आश्वासक डोळे. अशा या ऋषीतुल्य दिसणाऱ्या गृहस्थांच्या छायेत आपण काही वर्ष रहाणार आहोत हे त्यावेळी ध्यानीमनीही नव्हते. नंतर भावाने त्यांच्याबद्दल माहिती दिली. ते जळगावहून ठाण्यात आलेत आणि ठाणा महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. ना. ग. गोरे, एस्.एम. जोशी, जयप्रकाश नारायण यांसारख्या विचारवंतांच्या पठडीतले सर ठाण्यात आल्यानंतर समाजवादी युवक संघटनेला जोडले गेले. तेच आमचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य म. द. नाडकर्णी सर!

या नंतर सरांची आणि माझी भेट झाली मी महाविद्यालयात नोकरीसाठी रुजू झाले तेव्हा, म्हणजे जून १९७६ मध्ये. मी प्राचार्यांच्या केबीनमध्ये गेले. सरांना मी ओळखत होतेच. मुलाखतीत त्यांनी काही प्रश्न विचारले, त्यांची मी उत्तरे दिली. यानंतर त्यांना कुरुंदकरांच्या भाषणाची आठवण करून दिली आणि मी प्रकाश दुर्वेची बहीण असे सांगितल्यावर ते दोन सेकंद स्तब्ध झाले. १९७२ साली माझा मोठा भाऊ गिर्यारोहण करीत असता मृत्यू पावला होता. सरांना ते माहीत होते. यानंतरच सरांच्या आश्वासक आपुलकीच्या आधारवडाखाली माझे कार्यालयीन काम सुरू झाले.

सरांच्या मार्गदर्शनाखाली कामाला सुरुवात झाली. अनेक चांगल्या विचारांचे, शिस्तशीर कामाचे बाळकडूच आम्हाला मिळाले. विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी आपण येथे काम करतोय ही भावना सरांच्यामुळे मनात रुजली. सुरुवातीला कार्यालयात आम्ही सहा कर्मचारी होतो. कामाचे फारसे विभाजन नव्हते. त्यामुळे सरांनी सांगितलेले कोणतेही काम शिकून पूर्ण करायचे. याचे कारण सरांची सांगण्याची पद्धत आणि आमच्यावर टाकलेला विश्वास हे होय. नाडकणी सर स्वतःदेखील संपूर्ण कार्यालयाच्या वेळात हजर असत. यामुळे सर्व कामाची माहिती झालीच, शिवाय सरांनी चांगल्या कामाच्या केलेल्या कौतुकामुळे काम करण्यात उत्साह वाटत असे.

आर्टस्, कॉमर्स, सायन्स हे सुरुवातीला एकत्रित महाविद्यालय होते. त्यानंतर विज्ञान महाविद्यालय विभागल्यानंतरचा आम्ही बहुतेक नवीन स्टाफ होतो. आम्ही शिकावू होतो. आम्हाला शिकविण्याचे सरांचे कसब उत्तम शिक्षकाचे होते. त्यामुळे आम्ही लवकरच तयार झालो. सरांची कामातली शिस्त आणि दरारा असला तरी तो आदरयुक्त भावनेनी आम्ही स्वीकारीत होतो. त्यांच्या शिस्तीपेक्षा त्यांच्यातल्या आपुलकीनेच भारून जात असू. महाविद्यालयात ते प्राचार्य असले तरी, आमची आमच्या कुटुंबाची ते वडिलकीच्या नात्याने चौकशी करीत असत. मला मुलगा झाला, तो सहा

महिन्याचा असताना मी भाजले होते. या दोन्ही प्रसंगी सर माझी विचारपूस करायला हॉस्पिटलमध्ये आले होते. इतका हळुवारपणा! ज्ञानेश्वर माउलींच्या पहिल्या अध्यायातल्या ''चकोर तलग्याच्या''च्या दृष्टांतासारखाच मृदूपणा सरांच्या स्वरात होता. म्हणूनच आमच्या प्राचार्यांचं नातं वडिलकीचं होतं असे मला वाटतं!

सरांना माझं अक्षर आवडत असे. त्यावेळी ऑफिसमध्ये मराठी टायपिंग मशीन नव्हते. सरांची स्वतःची आणि बरीचशी कार्यालयातील मराठी पत्रे, सर माझ्याकडून लिहून घेत असत. संयुजा अंकासाठी जे मराठी लेख येत असत ते माझ्या हस्ताक्षरातले पुढे छपाईसाठी पाठवले जात असत. सरांच्या एका पत्राची मला नेहमी आठवण येते. काँग्रेसच्या प्रतिभा पाटील (माजी राष्ट्रपती) या त्यांच्या विद्यार्थिनी होत्या. त्या प्रथम आमदार म्हणून निवडून आल्या तेव्हा त्यांना अभिनंदनाचे पत्र सरांनी माझ्याकडून लिहून घेतले होते. माझ्या हस्ताक्षरांचा सन्मान असा कधीच झाला नव्हता. सरांच्या घराजवळच मी राहात होते. त्यांना अचानक विद्यापीठात जायचे असेल आणि महत्त्वाचा निरोप असेल तर सर सकाळीच आमचे तीन जिने चढून घरी यायचे आणि निरोप देऊन जायचे. हाताखालची कारकून असा त्यांनी कधीही विचार केला नाही. केवळ चार वर्षात सरांशी असे नाते जुळले की, १९८० साली ते निवृत्त झाले तेव्हा डोळ्यांत पाणीच आले होते. निवृत्तीनंतरही त्यांच्याकडे भेटायला जाणे होत असे.

केवळ चार वर्षांचा सहवास, पण ती आयुष्याची सुरुवातीची नोकरीची वर्षं, मी जी काही घडले ती सरांच्या संस्काराची शिदोरी घेऊनच!

**– सौ. सुनीता रघुनाथ शेजवलकर**

•••

(पृष्ठ क्र.२५ वरून - **म. द. नाडकर्णी : आठवणीचे सुगंधी थेंब**)

यावे की नको? निर्णय होत नव्हता तेव्हा सुद्धा सरांनीच धीर दिला. पायऱ्या उतरताना सर माझ्या बरोबर आले ते दडपण कमी करून आत्मविश्वास वाढवण्यासाठीच.

सरांची चिरनिद्रा हा माझ्यासाठी फार मोठा दु:खाचा प्रसंग होता. हसते बोलते व्यक्तिमत्त्व असे अचानक जाते यावर विश्वासच बसत नव्हता, पण सत्य स्वीकारण्याला पर्याय नव्हता. अंबेजोगाईमधील महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सर विद्यार्थ्यांना प्रबोधित करताना म्हणाले होते, 'व्यक्ती गेली याचा शोक करू नका. त्यापेक्षा त्या व्यक्तीने तिच्या पाठीमागे सोडलेल्या उच्च संस्कारांचे जतन करा, पालन करा. कारण हेच संस्कार तुमच्या भावी जीवनामध्ये वाटाड्याचे काम करत असतात.' माझ्या यशस्वी शैक्षणिक, तसेच संशोधन प्रवाहात आणि आदिवासी बांधवांच्या समाजसेवेत आज सरांचे सर्व विचार, संस्कार माझ्या बरोबर वाटाड्याच्या भूमिकेत आजही चालत आहेत, अडथळा आला अथवा धडपडल्यास लगेच ते आधार देतात, सावरतात. अशा या सावरलेल्या क्षणांमधीलच ही सर्व शब्द श्रीमंती कागदावर सुगंधासह पसरलेली आहे, निमित्त आहे ते सरांच्या जन्मशताब्दी वर्षाचे.

**– डॉ. नागेश टेकाळे**
ब्लीस सी ३०२, वसंत ऑक्सर,
लाल बहादूर शास्त्री मार्ग,
मुलुंड (प). मुंबई– ४०००८०.
भ्रमणध्वनी – ९८६९६१२५३१
Email : nstekale@gmail.com

•••

# प्राचार्य नाडकर्णी सर

एम.ए. झाल्यावर अर्थातच चांगल्या नोकरीच्या शोधात होते. शिक्षकीपेशा पत्करायचा हे ठरलेलं होतंच. जून ते ऑक्टोबर कल्याणच्या एका महाविद्यालयात तीन महिन्यांसाठीच असलेल्या तात्पुरत्या नोकरीचा अनुभव घेतला होता. आता पुढे काय? हा प्रश्न पडलेला असतानाच १९७५ च्या ऑक्टोबर महिन्यात विद्या प्रसारक मंडळाच्या त्यावेळी संयुक्त असलेल्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागात अर्धवेळ शिक्षकाच्या पदासाठी जागा रिक्त असल्याचे समजले आणि खूप आनंद झाला.

प्राचार्य नाडकर्णी सरांची प्रत्यक्ष भेट मुलाखतीच्या वेळी झाली. खादीचे कपडे, अगदी साधी राहणी आणि मृदू संभाषण ही त्यांची वैशिष्ट्ये प्रथम भेटीतच लक्षात राहिली.

'राष्ट्र सेवा दल' हा आम्हा दोघांतील समान धागा होता. पण तरीही वयाने, विचाराने आणि कर्तृत्वाने ते इतके मोठे होते की, त्या आदरापोटी एक स्वाभाविक अंतर राखले गेले.

नोकरीची सुरुवात होती. त्यामुळे आपुलकीने ते अनेकदा मार्गदर्शन करीत. शिक्षकीपेशा ही नोकरी नाही तर ते एक व्रत आहे असे ते नेहमी सांगत असत. तसा आदर्श तर त्यांच्या रूपाने आमच्या पुढे होताच.

सर नेहमी प्रसन्न असत. रागावून ओरडून ते कोणाशी बोलत असल्याचे माझ्या ऐकिवात नाही, तरीही त्यांची कॉलेजच्या परिसरातील नुसती उपस्थिती किंवा वर्ग चालू असताना वर्गाबाहेरून त्यांनी मारलेली फेरीसुद्धा शिस्त राखायला पुरेशी असे. विद्यार्थीसुद्धा त्यांचा मान राखीत. त्यांचा स्वभाव सात्विक होता.

प्राचार्य म्हणून महाविद्यालयात भेटणारे सर संध्याकाळी गावदेवीच्या भाजीबाजारात हमखास भेटत असत. तेव्हा परिचित ज्येष्ठ व्यक्तीने जिव्हाळ्याने करावी तशी व्यक्तिगत चौकशीही करीत असत.

त्यांच्याबद्दलचे दोन प्रसंग सांगावेसे वाटतात. महाविद्यालयाच्या ११ वीच्या प्रवेश प्रक्रियेच्या वेळी प्राचार्यांनी आपण सांगू त्या विद्यार्थ्याला प्रवेश द्यावा यासाठी समाजातील विविध व्यक्तींचा व गटांचा दबाव असे आणि अजूनही असतो. याच संदर्भात नाराज झालेला कोणी 'शक्तिमान' असामी अद्वातद्वा बोलत सरांच्या अंगावर धावून आला. सर शांत उभे होते. उपस्थित सर्वजण स्तब्ध झाले होते. सरांच्या शांत पण खंबीर समजावणीने तो शांत झाला.

'राष्ट्र सेवा दला'च्या वतीने एक अभ्यासवर्ग चालत असे. तो आणीबाणीचा काळ होता. राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्नांच्या चर्चा होत असत. एका अभ्यासवर्गाला वक्ते म्हणून सर हजर होते. चर्चा करताना विषय देव असण्या-नसण्याकडे वळला. कोणीतरी सरांना विचारले की, तुमचा देवावर विश्वास आहे का? त्यावर सरांनी उत्तर दिले की, 'माझा विश्वास त्या अर्थाने नाही; पण दिवसातून एकदा मी देवाला नमस्कार करतो. त्याने मला बरे वाटते.' भोवताली प्रखर बुद्धिवादी व निरीश्वरवादी असताना दिलेले हे प्रांजल उत्तर व त्यामागचा प्रामाणिकपणा मला खूप भावला.

प्राचार्य नाडकर्णी सरांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. शिक्षकीपेक्षात पहिलं पाऊल टाकताना त्यांचे मार्गदर्शन लाभले हे मी माझे भाग्यच समजते.

**– प्रा. उषा बाळ**

•••

खऱ्या विद्यार्थ्याला कधीच सुट्टी नसते. सुट्टी ही त्याच्यासाठी नवं काहीतरी शिकण्याची संधी असते.

# प्राचार्य म. द. नाडकर्णी - एक ऋषितुल्य 'मॅटीनी आयडॉल'!

१९७६ च्या जून महिन्यात मी ठाण्याच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात बी.एस्सी. द्वितीय वर्षासाठी प्रवेश घेण्यासाठी कॉलेजच्या आवारात प्रवेश केला. माझं त्याआधीचं शिक्षण विदर्भातील अकोला येथे पूर्ण झालं होतं. या महाविद्यालयाची स्थापना नुकतीच झाली होती आणि आधी पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेलं हे महाविद्यालय आता मुंबई विद्यापीठाशी संलग्न करण्यात आलं होतं. मी प्रवेश घेण्यासाठी महाविद्यालयाच्या कार्यालयात गेलो आणि प्रवेश अर्ज भरला. त्या अर्जावर सही घेण्यासाठी मला प्राचार्यांना भेटावं लागणार होतं. मला प्रवेश मिळणार होता हे नक्की होतं. पण अकोल्यासारख्या त्यावेळी तुलनेने लहान असलेल्या शहरातून मी एकदम ठाण्यासारख्या शहरात आलो होतो ते एक दडपण होतंच; त्यात मुंबई विद्यापीठासारख्या जगप्रसिद्ध विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयात आपण आता शिकणार आहोत याचं देखील नकळत दडपण होतं. अशा विचारात असतांना मी प्राचार्यांसमोर कधी जाऊन उभा राहिलो ते समजलंच नाही. पण त्यांना पाहिल्यावर जरा धीर आला. त्यांचा तो शांत पण करारी चेहेरा आणि त्याच्या जोडीला प्रसन्न स्मितहास्य आणि आदराने मान खाली झुकावी असं त्यांचं व्यक्तिमत्त्व अजूनही मला चांगलं आठवतं. त्यांनी अर्जावर सही केली, चौकशी केली आणि 'भरपूर अभ्यास करावा लागेल बरं का' अशी सौम्य शब्दांत तंबी दिली. नंतर रीतसर कॉलेजचे वर्ग सुरू झाले. मी वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र हे विषय पदवीसाठी निवडले होते आणि नाडकर्णी सर रसायनशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यामुळे साहजिकच ते आम्हाला शिकवायला नव्हते. तरी देखील कॉलेजच्या विविध उपक्रमांमध्ये, सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये मी हिरिरीने भाग घेत असे आणि त्यामुळे सरांशी अनेकदा संपर्क येत असे. त्या काळात होणारी वार्षिक स्नेहसंमेलने म्हणजे नाटकं, एकांकिका, गाण्यांचे कार्यक्रम, विविध गुणदर्शनपर कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमांनी परिपूर्ण असत. त्यामुळे या ना त्या कारणाने नाडकर्णी सरांशी बोलणं होत असे.

सरांची राहणी अत्यंत साधी होती, पण अतिशय कडक शिस्त पाळणारे आणि सर्वांना पाळायला लावणारे आणि तत्त्वांशी कधीही तडजोड न करणारे प्राचार्य म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या करारी आणि निर्भीड स्वभावाचा प्रत्यय आम्हा विद्यार्थ्यांना एकदा आला होता. तो प्रसंग मला अजूनही चांगला आठवतो आहे. १९७७ सालच्या ऑक्टोबरमध्ये भारताचे तत्कालीन पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांनी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना भ्रष्टाचाराच्या आरोपावरून अटक केली आणि देशभर एकच गदारोळ उठला. चरणसिंग सरकारच्या विरोधात सर्वत्र मोर्चे, बंद, दंगली अशा अशांती फैलावणाऱ्या घटना घडू लागल्या. ठाण्यात देखील त्या दिवशी सकाळपासून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जागोजागी तोडफोड, दमदाटी करून दुकानं, दळणवळणाची साधनं बंद पाडायला सुरुवात केली होती. हे लोण हळूहळू शहरात पसरू लागलं आणि काही गुंडांचा मोर्चा आमच्या कॉलेजकडे वळला असून ते हातात लाठ्या काठ्या घेऊन अतिशय संतप्त होऊन कॉलेज बंद पाडायला निघाले आहेत अशी बातमी सरांना मिळाली. त्यावेळेस वेळापत्रकानुसार आमची वर्गावर्गांमध्ये लेक्चर्स, प्रयोगशाळांमध्ये प्रात्यक्षिके चालू होती. सर तर शिस्त आणि अनुशासन याचे भोक्ते होते. काय वाट्टेल ते झालं तरी कॉलेज बंद

करायचं नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आणि कॉलेजच्या व्यवस्थापनाला देखील याची कल्पना दिली. हे सगळं सुरू असतानाच एक ९०-१०० जणांचा समूह घोषणा देत कॉलेजच्या आवारात घुसला आणि आधी जोशी-बेडेकर महाविद्यालय बंद करायला लावून आता ते बांदोडकर महाविद्यालयाकडे वळले. चरणसिंग सरकारविरोधी घोषणांनी महाविद्यालयाचा परिसर दणाणून सोडला. अशात नाडकर्णी सर त्यांच्या कार्यालयातून खाली मोर्चा अडवण्याच्या निर्धाराने इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ येऊन उभे राहिले. त्या मोर्च्याचे काही म्होरके पुढे येऊन सरांना धमकावू लागले. सर आपल्या निर्णयावर ठाम होते. त्यावेळेचं तापलेलं वातावरण आणि 'मॉब सायकॉलॉजी' लक्षात घेता सरांवर हल्ला होण्याची देखील शक्यता निर्माण झाली होती. पण सर अजिबात न डगमगता अतिशय खंबीरपणे त्या म्होरक्यांना समजावण्याचा प्रयत्न करू लागले. आणि नंतर अतिशय कडक शब्दांत काहीही झालं तरी माझ्या विद्यार्थ्यांचं आणि महाविद्यालयाच्या मालमत्तेचं नुकसान होऊ देणार नाही अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली. या दरम्यान आम्ही सर्व विद्यार्थी प्रयोगशाळेतून खाली आलो. येणारा जमाव ऐकेनासा झाला, रेटारेटी सुरू झाली. त्यावेळेस नाडकर्णी सरांच्या बरोबरीने मोर्चाला सामोऱ्या गेल्या त्या आमच्या प्राणीशास्त्राच्या प्राध्यापिका डॉ. कुसुम गोखले मॅडम! मग आमच्यातले थोडेसे धिप्पाड, धटिंगण असलेले विद्यार्थी नाडकर्णी सर आणि मॅडमच्या भोवती उभे राहिले. त्या मोर्चातील कार्यकर्ते गुंड प्रवृत्तीचे होते आणि प्रसंगी दगडफेक करून महाविद्यालय बंद पाडण्याच्या तयारीत आले होते. परंतु सरांचा तो निडरपणा, आश्वासक भाव, दृढनिश्चय आणि त्यांनी शेवटी धारण केलेलं रौद्र रूप या जोडीने गोखले मॅडम व इतर प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्या एकीमुळे ते म्होरके आणि कार्यकर्ते यांना शेवटी नमतं घ्यावं लागलं आणि शेवटी त्यांनी काढता पाय घेतला. जाताना अर्थात थोडी दगडफेक करून गेले, पण अतिशय किरकोळ नुकसान झालं असावं. नंतर आम्ही सर्व आपापल्या कामाला लागलो ! या प्रत्यक्ष पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या घटनेमुळे नाडकर्णी सर आम्हा विद्यार्थ्यांचे 'मॅटीनी आयडॉल' झाले होते. अशा या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाला अत्यंत विनम्र आदरांजली!!!

**- डॉ. संजय जोशी**

बी.एस्सी. प्राणीशास्त्र (१९७६-७८)

●●●

---

(पृष्ठ क्र.३२ वरून - **प्राचार्य म. द. नाडकर्णी सर - एक अनुभव चिंतन**)

गेलो होतो तेव्हा त्यांच्या डोळ्यांवर पूर्णपणे पांढऱ्या पट्ट्या होत्या. डोळे पूर्णपणे झाकलेले होते. चौकशी अंती समजले की सरांनी आपल्या अवयव दानात आपले डोळे, म्हणजेच ''दृष्टी-दान'' केले होते.

खरोखरच, सर्व दृष्टीने जीवनात धन्य झाले होते आमचे नाडकर्णी सर!

जगाला ''दृष्टीदान'' करून
विद्यार्थ्यांना ''ज्ञानदान'' देऊन आणि
कॉलेज कर्मचाऱ्यांना ''अनुभवदान'' समृद्ध करून

''न भूतो न भविष्यती!''

**- मंजिरी सुभाष धर्माधिकारी**

पूर्वाश्रमीची जयश्री वामन ठकार
विद्यार्थिनी व कॉलेज कर्मचारी
बा. ना. बांदोडकर महाविद्यालय, ठाणे
अ-५०१, सन ऑरबीट,
आनंद नगर, वडगाव बुद्रुक,
पुणे - ४११०५१
भ्रमणध्वनी : ९९२००७०५२१

●●●

---

# ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व - आमचे नाडकर्णी सर

काळ असावा १९७२-७३ चा, आमचे घर आणि प्रांजली सोसायटीतील घर जवळच होते. माझे वडील विद्या प्रसारकच्या कमिटीवर होते. सर आंबेजोगाईहून आले होते. माझ्या वडिलांचा जन्म १९२० सालचा, तर नाडकर्णी सर १९२१ सालचे. दोघेही तसे समवयस्क. त्यामुळे दोघांचीही चांगलीच दोस्ती झाली. सर घरी येत असल्याने त्यांचे मला कधी दडपण वाटले नाही.

ते नेहमी प्रसन्न चेहऱ्याने वावरताना मी पाहिले. सदासर्वदा खादीचा वेष त्यांची स्वातंत्र्य लढ्यातील भूमिका उघड करे. ते खादीचे कपडे नेहमीच वापरत.

पुढे एकदा डॉ. नरेंद्र जाधव पुणे विद्यापीठाचे कुलगुरू असताना म्हणाले होते, 'प्रत्येक मुलात एक राजहंस लपलेला असतो तो फक्त शोधावा लागतो.' पण आमचे म. द. नाडकर्णी सर ते खूप पूर्वीपासून करत असत.

मी संस्कृती कमिटीवर काम करताना ढोलकीतरुण हरीभाऊ तडके, ट्रंपेट वाजवणारा कोळी, गाणारा विवेक वडगबाळकर आणि पं. शैलेश भागवत अशी गुणी मंडळी सरांनी कमिटीत घेतली.

वार्षिक स्नेहसंमेलनात वाद्यवृंद निवडताना प्राध्यापकांबरोबर सी. रामचंद्र यांच्याकडे गेलो होतो. त्यावेळी सी. रामचंद्र (रामचंद्र चितळकर) हे ६०+ वयाचे होते. गोरेपान. छान गावून नाचत होते. एक काळी सावळी, हडकुळी १८/२० वर्षाची मुलगी छान गात होती. पुढे कळले तिचे नाव कविता कृष्णमूर्ती होते.

**व्यक्तिमत्त्व विकास सरांचे सूत्र**

आकाशवाणीवर कार्यक्रम करण्याकरता सरांनी आम्हाला उद्युक्त केले. प्रा. अत्रे सरांबरोबर आम्ही मुलांनी कार्यक्रम केला. त्यात मी, रोहिणी जोग (माझी पत्नी) वगैरे होतो.

कॉलेजमधील सर्व कार्यक्रम नियोजन ते आम्हा विद्यार्थ्यांकडे सोपवत. सरांचे बारीक लक्ष असे. सूचना देत. आमच्या करता ते Management Lessons असत, ज्याचा पुढील करियरमध्ये खूप उपयोग झाला.

एकदा मी Boy's room मधे टेबल टेनिस खेळत होतो. तेव्हा मी टेबल टेनिस चॅम्पियन होतो. सरांनी गुपचूप मागे राहून माझा खेळ पाहिला. मला मग त्यांनी बोलावून विचारले, तू कॉलेजमधील मुलींना टेबल टेनिस शिकवशील का? त्यानंतर किमान ६ महिने मी एकटाच मुलगा Ladies room मध्ये टेबल टेनिस शिकवायला जात असे. सरांना खात्री होती की मी तिथे वावगे काही करणार नाही.

आणीबाणी लागू झाली आणि त्याचे प्रतिसाद घडू लागले. सर्व विद्यार्थी पुढील मैदानात जमा झाले. पोलिस पण आले. मी आणि राम आपटे (सध्याचे हायकोर्टातील वरिष्ठ वकील) कॉलेजच्या गच्चीवर गेलो तिथून आणीबाणी विरोधी हजारो पत्रिका भिरकावून दिल्या. मी मागील बाजूने येऊन सरांच्या बाजूला उभा राहिलो. राम वरून ओरडत राहिला, पकडला गेला, एक रात्र त्याने कोंडवाड्यात काढली.

दरम्यान एका इंन्स्पेक्टरने सरांवर काठी उगारली ती मी वरच पकडली आणि ओरडलो, 'सरांच्या अंगाला हात लावाल तर इथे दंगा होईल.' सरांनी त्या पोलिसांना ठणकावून सांगितले, 'तुम्ही कॉलेज कॅम्पसच्या बाहेर जा. मी परिस्थिती कंट्रोलमध्ये आणतो.' त्याप्रमाणे

---

शिक्षक ते नाहीत जे विद्यार्थ्यांच्या डोक्यात तथ्य जबरदस्ती थोपतात, शिक्षक तर ते असतात जे विद्यार्थ्यांना येत्या काळातील आव्हानांसाठी तयार करतात. -सर्वपल्ली राधाकृष्णन

पोलिस बाहेर रस्त्यावर गेले. मग सरांनी सर्वांना वर्गात जायला सांगितले. सरांची आज्ञा आमच्या करता ब्रह्मवाक्यच. लगेच सर्व मुले वर्गात गेली; असे सर.

सरांच्या सूचनेनुसार मी आणि आनंद नाडकर्णी सर्व वक्तृत्व, वादविवाद स्पर्धांना जात असू. अनेक ढाली, बक्षिसे आम्ही जिंकली. प्रबोधन सलग ३ वर्षे, पंडितराव, रानडे, लोकहितवादी वगैरे स्पर्धांमध्ये आम्ही जिंकलो. कधी रोहिणी जोग, जोला देव, प्रवीण दवणे वगैरे साथीदार होते. कथाकथन विद्यापीठीय स्पर्धा जिंकली. माझी आणि आनंदची बुडलेली practicles सर आमची एकट्याची करून घेत.

काही कारणाने आणि ह्या सांस्कृतिक activity मुळे आमच्या सर्व वर्गाने Jr. B.Sc. ची Physics ची Lectures बंक केली (Mass Bunking) पण मग परीक्षा आल्यावर घाबरलो. आम्ही सरांचे पाय धरले. सरांनी 'उद्या भेटू' असे सांगितले. सर खरे तर Chemistry विषयाचे; पण दुसऱ्या दिवशी त्यांनी २० प्रश्नोत्तरे आमच्या हातात Physics ची ठेवली 'हे नीट अभ्यासा, पास तरी व्हाल, आणि परीक्षेत त्यातील ८ प्रश्न आले आणि आम्ही तरलो. ह्या त्यांच्या ऋणांतून आम्ही कधीच मुक्त होणार नाही.

असे सर विद्यार्थ्यांचे हीत नेहमीच पहात. त्या काळी ठाणे परिसरातील अनेक गुंड मुले कॉलेजला होती. पण सरांपुढे ते नेहमीच नतमस्तक असत. असा सरांचा प्रभाव होता म्हणूनच कॉलेजमध्ये कधीच अप्रिय घटना घडली नाही.

एकदा कॉलेजमध्ये नटश्रेष्ठ मामा पेंडसे यांना मी आमंत्रित केले. मी कार्यक्रमाचे Comparing करत होतो. अचानक माईक बंद पडला. मी थांबलो, पण मामा पेंडसे यांनी जो आवाज लावला ते बघितल्यावर कळले की ते नटश्रेष्ठ का! ते म्हणाले अनेक नाटके माईकशिवाय करून शेवटच्या श्रोत्यापर्यंत आवाज आम्ही पोहचवायचो. असे अनेक किस्से असतील.

सरांच्याबरोबर प्रा. सिंधुताई पटवर्धन, प्रा. अत्रे, प्रा. सायनेकर, प्रा. केंदूरकर, प्रा. पाटील, प्रा. सारंग असे अनेक मोटीवेटेड प्राध्यापक होते.


सरांची तीनही मुले मंगलताई, विकास दादा आणि आनंद यांचा उत्कर्ष पाहिला. तीनही मुले त्यांच्या क्षेत्रात अत्युच्च स्थानावर आहेत. सरांच्या घरची पांढरी शुभ्र बैठक आणि तिथेच एका टेबलवर काम करत असणारी सरांची शांत मूर्ती आजही माझ्या डोळ्यांसमोर आहे. माणूस कितीही मोठा होवो. गुरूचरणी तो सदैव नतमस्तकच असतो.

नाडकर्णी सरांच्या आमच्या आयुष्यातील जवळीक हा आमचा सुवर्णकाळ होता हे नक्की.

**– शशांक रसाळ**

भ्रमणध्वनी – ९६६४२०९०२७

●●●




मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रो. राम जोशी (१९७४)

जीवनाला योग्य दिशा देण्यासाठी योग्य शिक्षक मिळणं तितकंच आवश्यक आहे
जितकं शरीरासाठी ऑक्सीजन!

# ती. स्व. नाडकर्णी सर यांना

ती. स्व. नाडकर्णी सर यांना,

शि. सा. नमस्कार,

मायना वाचून हसत असाल नं सर? पण त्या 'ती. स्व.'चा अर्थ तीर्थस्वरूप असा नाहीच आहे मुळी. त्याचा अर्थ आहे 'तीर्थरूप स्वर्गवासी'. सर, तुमची जन्मशताब्दी साजरी करतोय आम्ही. तुमच्या आठवणींना उजाळा देण्याचा हा छानसा हृद्य सोहळाच.

सर, कॉलेजच्या प्रवेशाचीच आठवण. साल १९७३. कॉलेज सुरू झाल्यानंतर उशिरानं प्रवेश घ्यायला आले होते. मला फॉर्म घेऊन प्राचार्यांच्या खोलीत पाठवलं. एकटीच होते. घाबरले होते. आत आले. माझा तो अवतार पाहून किंचित स्मित करीत म्हणालात, 'बसा.' बापरे! एवढी मोठी व्यक्ती आपल्याला 'अहो' म्हणत्ये याचंच अप्रूप वाटलं. समोरच्या व्यक्तीबद्दल इतकी आपुलकी, इतका आदरभाव! मग अतिशय शांतपणे उशिराने प्रवेश घेण्याची कारणे विचारलीत. बोलता बोलता माझी भीती जाऊन कधी मोकळेपणाने बोलू लागले समजलंच नाही. सर, समोरच्याशी बोलताना हवी ती माहिति लीलया काढून घेण्याचं हे कसब कमाल वाटलं.

अजून लक्षात आहे ती माझी 'LR' ची निवडणूक. आपला प्रचार करायचा असतो हे मुद्दाम बोलावून तुम्हीच सांगितलं होतंत नि वर्गावर्गांवर सुद्धा पाठविलं होतंत.

कॉलेजची LR झाल्यावर कॉलेजमध्ये मुलींसाठी 'श्रावणी शुक्रवार' साजरा करायचं ठरवलं होतं. सर, मला आठवतंय की, तसं लेखी पत्र मी घेऊन आल्यावर, कोणताही कार्यक्रम करताना त्याची आखणी कशी करायची, त्याचं नियोजन, संभाव्य अडचणी, त्यावर तोडगा, कार्यक्रमाचं ठिकाण, आसन व्यवस्था, येणारा खर्च, त्याची मंजुरी, अशा अनेक गोष्टींची जाणीव तुम्ही करून दिली होती. एखादा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लागणाऱ्या नियोजनाचा फार मोठा धडा नकळत शिकवून गेलात तुम्ही.

एकांकिका स्पर्धेच्या तालमींसाठी 'व्हील चेअर' हवी होती. सर, तुम्ही डॉ. बेडेकर यांच्याशी बोलून ती उपलब्ध करून दिली. पण तेही आम्हाला डॉक्टरांकडे पाठवून. इतकंच नाही तर सायन्स कॉलेजचं बांधकाम चालू होतं. तेथील एक खोली देऊन ती चेअर ठेवायची, नि तालमीचीही सोय करून दिली होतीत. इतका विश्वास टाकून त्यातून नकळत जबाबदारीची जाणीव मात्र करून दिलीत.

वर्षभर विविध उपक्रमांत, कार्यक्रमांत प्रोत्साहन द्यायचात तुम्ही. पण वर्षाअखेर मात्र आम्ही आता अभ्यास करताना दिसायला हवं असा प्रेमळ दमही तुम्हीच द्यायचात. इतकंच नाही तर आम्ही लायब्ररीत आहोत की नाही याकडेही तुमचं बारीक लक्ष असे. एव्हढेच काय, पण वर्ग चालू असताना बाहेर दिसलो तरी लगेच चौकशी होत असे. आमच्याबद्दल वाटणाऱ्या प्रेम आणि आपुलकीमुळे तुमच्याबद्दलचा आमचा आदर आणखीच वाढत गेला.

असे अनेक प्रसंग. तेव्हा नाही पण पुढे मुख्याध्यापिकेचा पदभार स्वीकारल्यावर अनेकदा तुमचा संयम, शांत वृत्ती, आदरयुक्त दरारा, विविध स्वभावांच्या व्यक्तींना प्रेमानं हाताळण्याचं कसब या नि अशा अनेक गोष्टी आपल्या अंगी रुजवण्याचा प्रयत्न मात्र मी करू लागले.

कला शाखेत असल्यानं वर्गातल्या आठवणी नसल्या तरी जीवनाच्या वर्गात खूप काही शिकले तुमच्याकडून हे नक्की. त्यासाठी सदैव ऋणी आहे मी.

आपली कृपाभिलाषी,

**रोहिणी रसाळ**



प्रमुख पाहुणे बापू नाडकर्णी
समवेत प्रा. नाडकर्णी सर
(१९७५-७६)



काव्यविषय व्याख्यानमाला
प्रा. कवी शंकर वैद्य



प्रमुख पाहुणे नटवर्य मामा पेंडसे
भाषण करताना

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| **सभागृहाचे नाव** | **ठिकाण** | **आसन क्षमता** |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.